विशेष स्पष्टीकरण ---



॥श्रीराम समर्थ॥

२६ जून २०२२

शब्दांचे मूल्य आणि मर्यादा ---

शिष्य विचारून बोले। स्वामी काहीच नाही उरले।
अरे 'नाही' बोलणेंही आले। नाशिवंतामध्ये॥४.९३

प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते. एका विशिष्ट मर्यादेपलीकडे शब्दांना देखील मूल्य उरत नाही.

अध्यात्मशास्त्रामध्ये अनेकदा परस्परविरोधी वाक्ये / वचने आढळतात.

भिक्षा ही कामधेनु / कल्पवल्ली — समर्थ रामदास —
भिक्षापात्र अवलंबणे। जळो जिणे लाजिरवाणे - तुकाराम

त्याचप्रमाणे शब्दांना मर्यादा असल्या तरी त्याचे महत्त्व नाकारता येणार नाही.

शब्दजालं महारण्यं चित्तं भ्रमणकारणम्॥ विवेकचू.

वेदांताच्या शब्दजालाच्या अरण्यात एकदा शिरले की माणूस भ्रमित होतो. दिशा हरवून जातात.

भगवद्गीता - श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा ------

हे अगदी खरं असलं तरी शब्दांचे मूल्य सांगणारे ज्ञानेश्वर महाराजांचे शब्द असे आहेत.

शब्दाचिया आसकडी। भेदनदीच्या दोन्ही थडी।
आरडत विरहवेडी। बुद्धि बोधु॥

भेदनदीच्या अलीकडच्या तीरावर बुद्धी, तर पलीकडे बोध आहे. या दोन चक्रवाक पक्ष्यांना एकमेकांचा विरह झाल्याने ती आर्तपणे ओरडत आहेत. अशा रूपकातून असे सुचवायचे आहे की वेदांतशास्त्रातील शब्द समजावून घेता आले नाहीत तर बुद्धि व बोध यातील भेद तसाच राहतो. परंतु जर, का बुद्धि बोधमय झाली तर त्यांच्यातील विरह संपतो व शब्दही संपून जातात. शब्दांची आवश्यकता उरत नाही, तेव्हा 'शब्दावाचून सारे समजू लागते. शब्दांशिवाय बुद्धिला बोध कसा होणार?



© www.madhaveeraghuveer.com

या दोन्हींचा Balance साधायचा असेल तर बुद्धिला बोधही व्हायला पाहिजे व शब्दांच्या अरण्यातही अडकता कामा नये. त्याचप्रमाणे — उपनिषद् सांगते —
नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुना श्रुतेन।
परंतु त्याचवेळी उपनिषदात असेही म्हटले आहे — — —
स्वाध्याय प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्।
म्हणजे स्वाध्याय/प्रवचन कधीही सोडता कामा नये. एकीकडे म्हणतात की — तुम्ही कितीही प्रवचन, स्वाध्याय, ग्रंथांचे अध्ययन केले तरी तुम्हाला त्याने 'ब्रह्मानुभव' येणार नाही. परंतु दुसरीकडे असे सांगितले आहे की "शब्दांची मदत घेतल्याशिवाय 'आत्मानुभव' नाही.
एक श्रुती अशी आहे — — —
न तत्र वाक् गच्छति न मनो
त्या ठिकाणी मन, बुद्धि, वाणी जाऊ शकत नाही. याचाच अर्थ — शब्दांशिवाय आत्मज्ञान नाही आणि शब्दांनीही आत्मज्ञान नाही.
बुद्धिशिवाय आत्मज्ञान नाही व बुद्धिला आत्मज्ञान नाही. ही शाब्दिक कसरत नाही.
सारासार बुद्धिने (विवेकाने आत्मा-अनात्मा जाणून घेतल्यामुळे अनात्म वस्तुंचा त्याग करायचा व उरते ते आत्मतत्व! परंतु जोपर्यंत बुद्धि शिल्लक आहे तोपर्यंत आत्मानुभव येणार नाही, बुद्धि आणि वृत्तीचा निरास व्हायला हवा. याचाच अर्थ असा की — शास्त्रज्ञान खूप महत्वाचे आहे परंतु शास्त्रज्ञान हे सर्वस्व नाही.
बाप उपेगी वस्तु शब्दु। स्मरणदानी प्रसिद्धु।
अमूर्तीचा विरादु। आरिसा नोहे॥ - अमृतानुभव
एखादा शब्द समोर आला की त्या शब्दामागील ज्ञानाची आठवण होते. असे शब्दांचे महत्व आहे. परंतु हे शब्दही ज्ञानप्रकाशापुढे फिके पडतात.

एवम् माध्यान्हीची दिवी ।
ना तमो धाडी ना दिवो दावी ।

ऐन दुपारी सूर्य तळपत असताना एखादी पणती लावली तर ती अंधार घालवत नाही किंवा उजेड दाखवत नाही. वृथा दीपो दिवाऽपि च। तसेच शब्दांचे आहे.

येथे शून्याचा निरास झाला । आत्मा सदोदित संचला ।
पाहे जाता साधकाला । ठावाचि नाही ॥ ८.७५॥

शून्याचा अनुभव येतो, याचाच अर्थ शून्य नाशिवंत आहे.

दररोज गाढ झोपेमध्ये (सुषुप्ति) काहीही समजत नाही. ना सुख ना दुःख । नुसती शून्यता असते. प्रत्येक त्याने आत्मसुख लाभते. परंतु ते काही आत्मज्ञान नाही.

साचाचे पुढती वीरा, जरी न येता स्वप्न जागरा ।
तरी ब्रह्मभावो साचो कारा । म्हणों येता ॥

गाढ झोपलेल्या माणसाला जर स्वप्न पडले नसते किंवा पुन्हा जाग आली नसती तर त्याला "ब्रह्मज्ञान" झाले असे म्हणता आले असते. परंतु तो जागा होताना पूर्वीचे जुने संस्कार जसेच्या तसे घेऊन जागा होतो.

ध्यानातही असेच घडते.

04 SUNDAY

इकडे दृश्य तिकडे देव । मध्ये शून्यत्वाचा ठाव ।
तया प्राणी मंदबुद्धिस्तव । ब्रह्म म्हणे ॥

© www.madhaveelaghuveer.com

## ४. साधन निरूपण –

कोणतीही गोष्ट प्राप्त करण्यासाठी काहीतरी प्रयत्न करावे लागतात. प्रयत्नावाचून काहीच मिळत नाही. मग ते व्यवहारात असो की परमार्थात परमेश्वर यत्न करणाऱ्यांनाच मदत करतो.

यत्न तो देव जाणावा।

किंवा असेही म्हटले जाते...

He helps them who help themselves.

यावेतनुरूप प्रयत्नांचे स्वरूप बदलेल. फळ मिळण्याचा कालावधी बदलेल. परंतु प्रयत्न न करता काही मिळेल असे सहसा घडत नाही. प्रयत्न करणाऱ्याला प्राप्ती होतेच. परंतु माणसे नेमकी इथेच कंटाळा करतात. टाळतात. आणि कठिण गोष्टीसाठी जर दुप्पट प्रयत्न करावे लागणार असतील तर ते मध्येच सोडून देतात. परंतु धीर पुरुष असे कधीही करत नाहीत. Chase the excellence &

न निश्चितार्थात विरमन्ति धीराः।

एक दोनदा अपयश आले तरी प्रयत्नात कमी पडत नाहीत. आणि प्रयत्न म्हणजे अभ्यास.

पुनःपुन्येन कुर्वीत इति अभ्यासः।

असाध्य ते साध्य करिता सायास।
कारण अभ्यास। तुका म्हणे॥

प्रयत्न केले तर वाळूचे कण रगडून तेलही मिळू शकते. निरक्षर बाई – ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्दावर हात ठेवून केवळ 'माऊली माऊली' म्हणत राहिली आणि तिला अर्थबोध। साक्षात्कार झाला. अध्यात्ममार्गात देखील दुस्तर माया तरून गेले तर ब्रह्मसाक्षात्कार होऊ शकेल.

© www.madhaveer.com

आणि या ग्रंथातून समर्थ मायेतून पार होण्याचे
8 उपाय सांगत आहेत आणि ते आहे 'साधन'।
साधन म्हणजे उपासना! ती जीवाने करायची
9 असते. ईश्वराच्या आज्ञा पाळायच्या असतात.
जीव हा नियम्य तर ईश्वर हा नियामक आहे.
10 ईश्वराच्या आज्ञा पाळून त्याची उपासना करता करता
चित्त शुद्ध व शांत होते व जीवाला ब्रह्माशी
11 एकरूपता साधता येते. शास्त्रकारांनीही घडी बसवून
दिली आहे. त्याचा ध्यास घेत वाटचाल करायची,
12 यालाच साधना म्हटले आहे. आणि माणसाला
हे मनापासून आवडते. ती त्याची सहजस्थिति आहे.
माऊली - देखे मनुष्यजात सकळ। स्वभावता भजनशीळ।
1 जाहले असती केवळ। माझ्याचि ठायी।
मनुष्यजात म्हणजे सगळी माणसे! पुन्हा सकळ हा
2 शब्द वापरून द्विरुक्ती केली आहे. म्हणजेच या
3 विधानावर भर दिला आहे. स्वस्य भावः स्वभावः।
सच्चिदानंद आत्म्याशी एकरूप झाल्यानंतर
4 वेगळेपणा उरत नाही. तदाकारता येते. एका त्याला
जाणले की सर्व जाणले असे समजावे आणि म्हणूनच
5 भाष्यासह प्रस्थानत्रयीचा सूक्ष्मातिसूक्ष्म श्रवण
करण्याचा अभ्यास कधीही सोडू नये.
6 राजा परीक्षितिचा केवळ सात दिवसांवर
असणारा मृत्यु भागवत श्रवणाने टळला. तो मुक्त झाला
म्हणूनच हृदयाचा कान करून ऐकावे.
Heart — Hear — Art — ear
कल्याणस्वामींनी दासबोध लिहिताना प्रत्येक शब्द
जिवाचा कान करून ऐकला
कान समोरासमोर असतात. त्याने श्रेयस्कर गोष्टी
 ऐकाव्यात.

© www.madhaveeraghuveer.com

## ४. साधन निरूपण -

जे सकळ साधनांचे सार। जेणे पाविजे पैलपार।
जेणे साधने अपार। साधक ते सीध्द जाले॥१॥

जे साधन सर्व साधनसमूहाचे सारभूत आहे. ज्या साधनाने माणूस अज्ञानसागर पार करून पलीकडील काठाला पोहोचतो आणि ज्या साधनाने असंख्य साधक सिध्द बनले, ते साधन तुला सांगतो.

श्री समर्थांनी जे साधन सांगितले आहे त्याचे तीन गुण आहेत. १. परमार्थामध्ये अनेक साधने सापडतात. त्या सर्व साधनांचे मर्म ज्यात साठवले आहे असे हे साधन आहे. २. अज्ञानाचा निरास करून आत्मज्ञान प्रकाशित करणे हे सर्वच साधनांचे कार्य असते ते कार्य हे साधन हमखास करते. ३. या साधनमार्गाने जाणारे असंख्य साधक आजपर्यंत साधकाचे सिध्द बनले हा येथे प्रत्यक्ष पुरावा आहे.

शास्त्राने सांगितले की श्रवण करावे. वेदांतशास्त्र भक्तिशास्त्र, योगशास्त्र याविषयी भरपूर ऐकावे, वाचावे आणि सांगावे. या तिन्हींना 'श्रवण' असे म्हटले आहे.

जग हे ज्ञान निवर्त्य आहे. म्हणजे ते ज्ञानाने निवृत्त होते. मिथ्या जगाचे स्वरूप आपल्याला समजते. निवृत्त होणे म्हणजे नष्ट होणे नाही. प्रत्येक कार्यामागील कारण शोधण्याची सवय लागली म्हणजे आदिकारण ब्रह्मापर्यंत जाता येते.

उदा० हे पुस्तक आहे. ते अनेक पानांचे / कागदाचे बनले आहे. त्या कागदामागे गवताचा लगदा व पाणी आहे. त्यामागे बांबू आहे. बांबू पृथ्वीतून वर आला आहे. पृथ्वी ही पाणी आटावून झाली आहे. पाणी अग्नितून अग्नि वायुतून वायू आकाशातून. आकाश ब्रह्मापासून आले असे जर तत्वतः समजले तर पुस्तक हे ब्रह्म वाटायला लागले



© www.madhaveeraghuveer.com

SEPTEMBER 10
SATURDAY

Heart - ear, hear

हे जर डोळ्यात नीर बसले असेल तर
जे जे देखिजे भूत ते ते जाणिजे भगवंत।
किंवा भरला घनदाट हरि दिसे। हे समजते.
पण पुस्तक शेवटी पुस्तकच आहे. हातात धरायचे आहे. वाचायचे आहे. Cover घालून जपायचे आहे. चोरीला जाता कामा नये. हे सर्व खरे असले तरी पुस्तकाचे स्वरूप ओळखायचे आहे.
चोरीला जाते ते पुस्तकच असते. कम नसते.

11 SUNDAY

ते हे जाण रे श्रवण। करावे अध्यात्मनिरूपण।
मनन करिता समाधान। निजध्यासे पावती॥२॥

ते साधन म्हणजे श्रवण होय. आत्मस्वरूपाबद्दल जे श्रवण केले त्याच्यावर विचार करावा. अशा सतत चिंतनाने स्वरूपाचे ध्यान लागते. त्या ध्यानाने आत्म-स्वरूपाच्या ठिकाणी समाधि लागते.

श्रवण हा पारिभाषिक शब्द आहे. मात्र श्रवणा नंतर त्यावर स्वतंत्र विचार व्हायला हवा. या विचाराला 'आत्मानात्मविवेक' म्हणतात. त्यात अनात्म हे आत्म्यापासून वेगळे काढले जाते. वेगळे काढलेल्या अनात्म्याची किंमत ~~अत्यल्प~~ अगदी कमी आहे. हे आतून पटते. त्यामुळे अनात्मवस्तूंना चिकटलेले मन आपोआप तेथून सुटते. या मनाच्या सुटण्याला अनासक्ती किंवा वैराग्य म्हणतात. असे हे दृश्याच्या नावडीतून सुटलेले मन सूक्ष्म होते. आणि ते आत्म्याच्या ठिकाणी काही काळ राहू शकते. याला निजध्यास म्हणतात. त्यातून समाधि अवस्था प्राप्त होते. समाधि पचली की जीव शांत, तृप्त व समाधानी होतो.

श्रवणापासून आरंभ होणारा व समाधानापाशी संपणारा हा साधन मार्ग परमार्थाच्या प्रवासातील राजमार्ग आहे.

म्हणून समर्थ त्याला एवढे महत्व देतात.

~~छांदो~~ बृहदारण्यक म्हणते.

आत्मा वा रे श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः।

लौकिक साहित्य वाचनाने चित्त विचलित होते तर अध्यात्मग्रंथांच्या श्रवणाने चित्त परमेश्वरचरणी स्थिर होते. त्या विश्वनियंत्यापुढे नतमस्तक होते.

वेदांतशास्त्राच्या तात्पर्याच्या निर्णयाला 'श्रवण' असे म्हणतात. वेदांतसार समजले म्हणजे मग 'श्रवण' पूर्ण होते.

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः।

ही दृष्टी एकदा मिळाली की मग दृष्टीला काहीही दिसले तरी त्या गोष्टीच्या मिथ्यत्वाचा निर्णय होऊन जातो आणि त्या अदृश्य शक्तीवरील श्रद्धा दृढ होऊ लागते.

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती
चालविसी हाती धरोनिया ॥

तेच बोलावे, वाचावे व सांगावे. मात्र त्यासाठी अध्यात्माची गोडी लागायला हवी. त्यासाठी आपलं अध्यात्मावाचून अडायला हवं त्यासाठी विवेक हवा.

Mobile Connectivity नसली तर माणसे अस्वस्थ होतात. तशी परमेश्वरावाचून तळमळतील का? ही तळमळ हवी. सतत अनुसंधान हवे.

आत्मा वारे वा श्रोतव्यः मन्तव्यः द्रष्टव्यः निदिध्यासितव्यः।

श्रवणानंतर मनन निश्चित हवे.

भोजनाचा कालावधि ½ / १ तासाचा असला तरी ते पचण्यासाठी २३ तास लागतात.

मनन करिता समाधान । निजध्यासे पावती ॥

संत सज्जन महानुभावी । परमार्थचर्चा करीत जावी ।
हईगई सर्वथा न करावी । ज्ञातेपणे करूनी ॥३॥

सर्व आत्मज्ञानी पुरुषांनी आत्मस्वरूप आणि त्याची साधना याबद्दल सुखसंवाद अवश्य करावा. मला सर्व कळले या भावनेने चर्चेची उपेक्षा करू नये.

आपल्या बहिर्मुख वृत्तीला अंतर्मुख करायचे हे साधनाचे प्रमुख कार्य आहे. आत उतरून ती स्वस्वरूपी रमू लागली म्हणजे साधनाला पक्केपणा आला असे मानावे. ते होत नसेल तर साक्षात्कारी पुरुषांच्या संगतीत अधिक काळ घालवावा. त्यांच्यातील परमार्थ संवादामुळे वृत्ति आत जाऊन स्थिर होते. असाच बराच काळ गेल्यावर परमार्थविषय बुद्धीने नीट आकलन होतो

परंतु 'आता मला सर्व काही कळले' अशी भावना होऊन जर संतसंगति सोडली तर वृत्ति धोका देऊ शकते. त्यासाठी आत राहण्याचा मनाचा सहजस्वभाव बनेपर्यंत अध्यात्मश्रवण करीत जावे. संतांच्या शब्दांमध्ये संशयाचे छेदन करण्याची शक्ती असते. त्याचा लाभ घ्यावा.

यापुढे जाणण्यासारखे काहीच शिल्लक नाही असे ज्ञातेपण मिरवून ज्ञानग्रहणाचा आळस, कंटाळा करू नये. कारण प्रत्येकाची विचार करण्याची क्षमता दृष्टांत Approach वेगळे असतात. निरनिराळ्या लोकांकडून असे विचार ऐकायला मिळाले तर आपला विषय पक्का होतो. दृढीकरण होते. आपल्या निश्चयांना पुष्टि मिळते. म्हणून एकत्रितपणे परमार्थचर्चा व्हावी तर एकमेकांचे एकमेकांना प्रबोधन होते. व आपली वाटचाल अनुभवापर्यंत सुरु होते.

एकस्तपो द्विरध्यायी । हे वचन हेच सांगते. अभ्यास करताना अनेक विद्वानांची मते विचारात घेतली तर अभ्यास सर्वांगीण होतो.

© www.madhaveeraghuveer.com

प्रत्येकाचा Approach निराळा असतो. दृष्टांत भिन्न असतात. त्यामुळे आपल्या विचारातील त्रुटी दूर होतात किंवा त्याला पुष्टि मिळते. ज्ञानाचे दृढीकरण होते. ते घट्ट पक्के होते. खंडन मंडनामुळे विषय ठसतो. एकमेकांचे प्रबोधन होते. ∴ शास्त्रार्थ- वादविवाद

एखाद्या शिबिरामध्ये व्यवस्थेत किंचितही हयगय चालत नाही. चहा, स्नान, भोजन, आसन - - -
परंतु आग्रह कशाचा धरायचा याविषयी जागरूक असावे. प्रवचनात योग्य शंका जरूर विचाराव्यात.
तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
शंका विचारण्याचा संकोच करू नये.
श्रवण मननातून निजध्यास साधणे हा साधनामार्ग परमार्थातील राजमार्ग आहे

चकार
परमार्थ उठाठेवी करिता। लाभाचे आहे तत्वता।
दिवसेंदिवस शुधता। वृत्तीस होये नीच नवी॥४॥
श्रवण आणि मनन। या ऐसे नाही साधन।
म्हणोनी हे नित्य नूतन। केले पाहिजे॥५॥

परमार्थ चर्चेचा खटाटोप केला तर खरोखरच फायदा होतो. दिवसेंदिवस वृत्ती शुध्द होत जाते. ती अधिकाधिक निर्मळ होत जाते.

श्रवण आणि मनन। या ऐसे नाही साधन।
म्हणोनी हे नित्य नूतन। केले पाहिजे॥

श्रवण-मनन यासारखे परमार्थाचे अन्य साधन नाही म्हणून ते सतत आणि नवे नवे करणे जरूर आहे.

दृश्याच्या सततच्या चिंतनाने आपले मन दृश्याने भरून जाते ते स्वस्वरूपाच्या चिंतनाने भरून टाकायचे परंतु स्थूल मन तिथपर्यंत पोहोचू शकत नाही. संतांच्या सहवासामध्ये मात्र मन अध्यात्माने भरून जाते. हळूहळू ते दृश्यातून मागे सरते व तरल बनते. असे तरल झालेले मन सहजस्वरूपी स्थिर होते. अशा दृश्याची वासना क्षीण होऊन सूक्ष्म झालेल्या मनालाच शुध्द मन म्हणतात. मन शुध्द होण्यासाठी श्रवणापाठोपाठ मननाची आवश्यकता असते. दोन्हीमध्ये सातत्य हवे परंतु त्याचाही कंटाळा येऊ नये म्हणून त्यात नाविन्य हवे. सत्पुरुषांचे ~~मन~~ हे प्रतिभावान असल्याने त्यांच्या संगतीतील श्रवणात नाविन्य असते. आत्मस्वरूप अनंत असल्याने त्याच्या चिंतनातही नाविन्य असतेच. म्हणून संतांकडून आत्म्याबद्दल श्रवण केले व नंतर त्यावरच मनन केले तर त्यात सातत्य व नाविन्य दोन्ही राहील.

परमार्थमार्गाला लागलेल्या मनुष्याचे कधीही अकल्याण होत नाही. त्याची वृत्ति दिवसेंदिवस शुद्ध होत जाते.

न हि कल्याणकृत्कश्चित् दुर्गतिं तात गच्छति

सतत श्रवण मननाने वासना, विकार, कल्पना, धारणा अधिक चांगल्या होत जातात.

नित्यनूतन - रोज नवीन वाचावे, ऐकावे असे नाही परंतु त्यावर विचारमंथन व्हायला हवे. त्याच ग्रंथातील श्लोकाचा/ओवीचा नवीन अर्थ उमगतो.

सतरा ठिकाणी निष्ठा ठेवणाऱ्याला वेश्येची उपमा दिली आहे.

नित्यनूतनता त्याच्या स्वरूपात नाही तर प्रकटीकरण शोधायची असते. भक्तीचे देखील व्यसन लागायला हवे. विद्याव्यसनं व्यसनं हरिपादसेवनं व्यसनम्।

मनुष्याने आपले ज्ञान सतत वाढवत रहावे. जोडीला परमेश्वराचे चिंतन करावे. आकलनशक्ती वाढते. ज्ञान - माहिती - चातुर्य - तंत्र - फरक आहे

एकदा डोळ्याने व एकदा डोक्याने वाचायचे.

जिथे आहात तिथून पुढे चला. हळूहळू साधन वाढवा उशीरा का होईना, नक्की पोहोचाल.

18 SUNDAY



© www.madhavaraghuveer.com

२३ जुलै २०१८

जैसे ग्रंथी बोलिले । तैसेचि स्वयें पाहिजे जाले ।
येथें क्रियेच्या माथां आले । निश्चितार्थें ॥६॥
जे ग्रंथीं जो विचार । वृत्ती होये तदाकार ।
म्हणोनी निरूपण सार । भक्ति ज्ञान वैराग्य ॥७॥

परमार्थ ग्रंथामध्ये ज्या अवस्था वर्णन केलेल्या असतात त्या आपण स्वतः अनुभवल्या पाहिजेत. अर्थरूपाने त्या निश्चितपणे अंतःकरणात ठसणे हीच येथील क्रिया असते.

ज्या ग्रंथामध्ये जे विचार असतात, त्यांच्याशी मन तद्रूप होऊन जाते. परमार्थ ग्रंथामध्ये भक्ति, ज्ञान आणि वैराग्य यांचेच विवेचन असते.

मनापासून कोणताही ग्रंथ वाचणे हे श्रवणच आहे. अध्यात्म ग्रंथ नुसते विचार देत नाहीत तर ते आचरणात आणण्याचा आग्रह धरतात. प्रथम त्यातील विचारांशी तदाकार झाले की अंतरंग बदलते. त्यातून अंतःकरणात भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचा परिपोष होतो. माणूस परमार्थाचा अधिकारी होतो.

ग्रंथाचे अर्थ शोधताना, ग्रंथाप्रमाणे वागताना, आपल्या प्रकृति व प्रवृत्तिचे भान ठेवावे. प्रामाणिकपणे प्रयत्न करावे.

श्रवण करताना कथा लक्षात राहतात. परंतु त्यातील मर्म /आशय जाणून घ्यावा. दृष्टांतापेक्षा सिद्धांतावर भर द्यावा. ग्रंथातील भक्ति, ज्ञान, वैराग्य हे जाणून घ्यावे. हेच निरूपणाचे सार आहे.

सुरुवातीला पुण्य मिळण्यासाठी ग्रंथ वाचावे. कारण असे काही आमिष असल्याशिवाय त्याकडे प्रवृत्ति होणार नाही. मग हळूहळू पुण्याची भाषा कमी होऊन साधनेची भाषा वाढवावी अशा रीतीने मनाच्या मार्फत बुद्धिवर संस्कार सातत्याने होत रहातात. परंतु आतमध्ये बुद्धिचे निर्णय (जुने) असतात. त्यातच बाहेरून शास्त्रांचे संतांचे नवे निर्णय येतात. त्या नव्या-जुन्याची टक्कर होते. आणि साधकाला त्रास होतो. मनाने इंद्रियांना आवरून धरले की जुन्या निर्णयाप्रमाणे आचरण होत नाही आणि नवे निर्णय बुद्धिवर ठसवणं सोपं जातं. जुने निर्णय पुसून टाकून नवे निर्णय स्थिर करणे हीच आहे साधना!

वासनेच्या विरुद्ध परंतु संतांच्या शिकवणीला अनुकूल असा निर्णय चित्त समत्वाने घट्ट पकडून ठेवते. कोणताही नवा ग्रंथ वाचताना त्यामध्ये साधनेसंबंधी काय मार्गदर्शन मिळते याकडे लक्ष ठेवावे. त्यावर अक्षरशः घारीसारखी झडप घालावी. हळूहळू आपली साधना Sharp होत जाते. योग्य दिशेने, नियमितपणे होऊ लागली की मग अपेक्षित परिणाम साधता येतो.

## शिष्य गुरुला पेचात पकडायचा प्रयत्न करतो भाग १

तो शिष्य म्हणे स्वामी सर्वज्ञा। सत्य करावी प्रतिज्ञा।
नाशिवंत घेऊन साधना। वरपडें न करावें।।ना।
अरे शिष्या चीत द्यावें। नाशिवंत तुवां वोळखावें।
साधन न लगे करावें। प्रतिज्ञाच आहे।।६।।

हे ऐकून शिष्य म्हणाला की, "अहो स्वामी, आपण सारे काही जाणता. आपण दिलेले वचन पूर्ण करावे. आपण माझ्याकडून नाशिवंत घेतलेत. आता मला साधन करायला लावू नये. तेव्हा स्वामी सांगतात—

अरे शिष्या, तू नीट लक्ष दे. नाशिवंत कोणते ते तू नीट जाणून घे. तुला साधन करावे लागणारच नाही. ही माझी प्रतिज्ञा मला पूर्ण मान्य आहे.

शिष्याने जर सारे नाशिवंत गुरुंना दिले तर गुरु त्याला परमात्मदर्शन करून देणार हे ग्रंथाच्या सुरुवातीलाच सांगितले आहे. त्यानुसार शिष्य आठवण करून देतो आहे. मात्र स्वामी त्याला या संकल्पनेतील खोल व गूढ अर्थ समजावून सांगतात.

सामान्य माणसाच्या अनुभवक्षेत्रात त्याला आत्मा व अनात्मा अशा दोनच वस्तु प्रत्ययाला येतात. त्यापैकी आत्मवस्तु अविनाशी तर अनात्म वस्तु नाशिवंत असतात. हे तो जाणतो. मात्र त्याचा विस्तार त्याला माहिती नसतो. त्यामुळे त्याच्या मनात संभ्रम निर्माण होतो. त्याला वाटते की सर्व नाशिवंत देऊनसुध्दा अजून आपल्याला आत्मदर्शन कसे होत नाही? याचे उत्तर मिळण्यासाठी नाशिवंताची संकल्पना नीट तपासायला हवी.

चित्त द्यावे - १. लक्ष देऊन एक
२. जे दिलेस त्यात प्रामुख्याने चित्त दे

मी माझी प्रतिज्ञा पाळायला तयार आहे. पण तू मला चित्त दे. आणि नाशिवंत काय आहे ते ओळख. नाशिवंताला ओळखणे मूळातच



© www.madhaveeraghuveer.com

नाशिवंत सोडणे आहे. आणि यापलीकडे कोणतीही साधना करावी लागत नाही. हे माझे वचन निश्चित आहे.

वस्तुत्याग म्हणजे भौतिक गोष्टी सोडणे. परंतु संगत्याग ,, त्यावरची आसक्ती सोडणे.

वृत्तीमध्ये पालट व्हायला हवा. कित्येकदा संग सोडला तरी वृत्ती घुटमळत रहते. म्हणून वृत्तीचे तरंग नकोत.

समचरण दृष्टी विटेवरी साजरी।
तेथे माझी हरि वृत्ती राहो।।

इथे तुकाराम महाराज काया किंवा शरीर म्हणत नाहीत तर वृत्ती म्हणतात. इतकी संतांची शिकवण शास्त्रशुद्ध व मार्मिक आहे. संतांनी लोकांचे कल्याण व्हावे हीच त्यामागे तळमळ आहे. त्यांचा बाणाही एकच आहे.

आपणासारिखे करिती तत्काळ।
नाही काळवेळ त्यालागी।।

परंतु हे प्रापंचिकांना समजत नाही. त्यांच्या आवडीनिवडी सवयी सोडायला ते काही तयार नसतात. यामुळे संत व सामान्यजन यातील अंतर कमी होत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

प्रतिज्ञा करावी प्रमाण । ऐसे बोलतो हा कोण ।
नाशिवंत केले मदार्पण । त्याहीमध्ये तो आला ॥१०॥
तू म्हणसी जे दियले । तरी देयास कोण उरले ।
जे उरले ते पुरले । मजकडे ॥११॥

आपली प्रतिज्ञा खरी करावी असे तू म्हणतोस पण जो कोणी हे बोलतो, तो कोण आहे? सारे नाशिवंत गुरूला देऊन टाकले म्हणताना तोही त्यात आलाच ना?

सर्व काही दिले असे तू म्हणतोस, मग जो ते देणारा आहे तो त्या देण्यातून शिल्लक कसा राहील? जो देणारा उरला असे वाटते तो गुरूला दिला गेलाच असतोच.

देह नर पंचमहाभूतांचा आहे त्यामुळे तो नाशिवंत आहे हे पटते. मन आणि बुद्धि अस्थिर आहे. त्यामुळे मन बुद्धि आणि त्यांनी केलेली कल्पना नाशिवंत आहे हे सहज पटते. परंतु मी करणारा किंवा मीपणाने वावरणारा अहंकार नाशिवंत आहे हे काही सहजासहजी पचनी पडत नाही. व्यवहारामध्ये घडून येणाऱ्या कर्मांचे कर्तेपण हा मी आपल्याकडे घेतो. या क्रिया जशा नाशिवंत असतात तसा हा मी देखील नाशिवंत असतो. त्याचा अंतर्भाव नाशिवंतामध्ये होणार असेल तर तो 'मी' सुध्दा गुरूला अर्पण केल्याशिवाय पूर्ण समर्पण होणार नाही. सर्वस्व देणे म्हणजे नाशिवंत सर्व देणे पण हेच माणसाला जमत नाही. माणूस सगळे देतो पण 'स्व' हातचा राखून ठेवतो. त्यामुळे त्याच्या पदरात काहीच पडत नाही, आत्मदर्शन घडत नाही.

हृदयात द्वैत असते, त्रिपुटी असते. ही तिन्ही अंगे परस्परावर अवलंबून असतात. व्यवहारामध्ये द्यायची वस्तू घेणाऱ्याला देऊन देखील देणारा शिल्लक उरतो.



© www.madhaveerahuveel.com

गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयाः।



अशा वेळी गुरुशिष्यांचे नाते पूर्णत्व पावते.



परंतु परमार्थामध्ये द्वैताचे पर्यवसान अद्वैतामध्ये करावे लागते. तिथे देणारा शिक्षक राहत नाही.
ध्याता ध्येय ध्यान. हे संपून जाते
शिष्य नाशिवंत प्रक्रिया

आत्मज्ञान हे (वस्तुतंत्र) आहे. सहज आहे. ते निर्माण करावे लागत नाही. सूर्य स्वयंभू आहे. अत्यंत तप्त वायूचा गोळा (उष्ण) आहे. त्याला बाहेरून स Supply करावा लागत नाही. तो वस्तुतंत्र आहे. परंतु दिवा, कंदील, Torch हे (कर्तृतंत्र) आहेत. ते पेटवावे लागतात

वस्तुतंत्र ज्ञानासाठी तुमच्या दुसऱ्या कृतीची आवश्यकता नसते. मी जी साधना करतो, त्यामुळे मला अस्तित्वात असलेल्या आत्म्याचा अनुभव येतो. आत्मा काही माझ्या साधनेने निर्माण होत नाही. तो असतोच. मात्र त्याचा अनुभव घेण्यासाठी साधना हवी. आपण पंखा लावतो तेव्हा नवीन हवा निर्माण करत नाही तर असलेली हवाच फिरवायचं काम करतो.

प्राप्तस्य प्राप्तिः हे आत्मज्ञानाचे सूत्र आहे. आत्मा नित्यसिद्ध आहे. तो सिद्ध करण्याची वेगळी आवश्यकता नाही. म्हणून शिष्य विचारत आहे



की मग तुम्ही मला साधना करायला का सांगता?

गुरु सांगतात — बरोबर आहे, साधना करावी लागत नाही हे बरोबरच आहे. पण अशी प्रतिज्ञा करणारा कोण आहे? [तुझा जीव आहे] याचाच अर्थ तू



अजूनही जीवभाव सोडलेला नाहीस. ∴ मनात प्रश्न येतात. / शिष्याचे संदेह पूर्णपणे नष्ट व्हायला हवेत

© www.maharaghuveer.com

तू नाशिवंतामध्ये आलासी । आपणास का रे चोरीसी ?
नाशिवंत देता चकचकीसी । फट रे पढतमूर्खा ॥३२॥

देणारा जो मी तो नाशिवंत आहे. असे जर आहे तर नाशिवंत सर्व देताना स्वतःला वेगळे बाजूला का काढायचे ? जे नाशिवंत आहे ते द्यायला कां कू करणे म्हणजे शहाण्याने गाढवपणा करण्यासारखे आहे.

जीव सांत तर परब्रह्म अनंत आहे. जीव हा त्याचाच अंश असल्याने त्याला अनंताची तहान आहे.

शरीर, मन, बुद्धी यांच्याबरोबर असणारा जीव म्हणजे 'मी'! हा अहंकार ही आपल्या सांतपणाची खूण आहे.

अहंकार, मन, बुध्दी, शरीर सर्व नाशिवंत आहे.

सारे नाशिवंत द्यायचे ठरल्यावर त्यातील अहंकार वगळून चालणार नाही. हे त्याला कळते पण वळत नाही. अहंकार देण्याची जी शेवटची झेप आहे ती तो घेऊ शकत नाही. इथेच खरा अविद्येचा प्रभाव दिसून येतो.

माझा मीपणा नाशिवंत असल्याने तो देऊन टाकायला हवा हे स्पष्ट कळत असून तो देण्याचे धाडस होत नाही. म्हणून श्री समर्थ त्याला शहाणा गाढव म्हणजे पढतमूर्ख म्हणत आहेत.

जोपर्यंत शिष्य प्रश्न विचारतो आहे तोपर्यंत संशय गेला नाही अर्थात जीवभाव गेला नाही. जीवदशा पूर्ण जाईपर्यंत शंका राहतेच.

माझ्या मागे कसं होईल ? असं वाटणं हेच जीवदशेचे लक्षण आहे. संस्था, संसार, समाज, व्यक्ती याबाबत कर्तृत्व भोक्तृत्व भ्रांती म्हटले आहे

SEPTEMBER
TUESDAY 27

2016
AUG

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | |

श्रीगुरुंना / संतांना दोनच गोष्टींची अपेक्षा –

१.. तेणे आम्ही सुखी, म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी।
शिष्याने अखंड नामसाधना करत रहावी आणि
ती करताना नामी (विठ्ठल) मध्ये एकरूप व्हावं.

२. माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव
आपणचि देव होय गुरु।
आपला जीवभाव विठ्ठलामध्ये समर्पित करावा.
म्हणजे शिष्य मुक्त मोकळा होतो.

फट् रे पढतमूर्खा – हत तुझी – –



© www.madhaveeraghuveer.com

शिष्य विचारून बोले। स्वामी काहीच नाही उरले।
अरे 'नाही' बोलणेही आले। नाशिवंतामध्ये।।१३।।
आहे म्हणता द्या काही। नाही शब्द गेला तोही।
नाही नाही म्हणता काही। उपजले की।।१४।।

शिष्य विचार करून म्हणाला की स्वामी काहीच उरले नाही.' त्यावर स्वामी म्हणाले, "अरे काहीच उरले नाही" हे बोलणे देखील नाशिवंतामध्ये येते.

जर काही आहे असे म्हटले तर ते देऊन टाकावे. ते दिल्यावर काही उरत नाही. म्हणून काही नाही असे म्हणण्याची गरज नाही. पण 'काही नाही, काही नाही' हे म्हणण्यातच शून्यपणाचा प्रत्यय येतो.

मी व तू असे दोघे आले की सांतपणा येतो. अल्पत्व येते. नाशिवंतपणा येतो. दोघे एकमेकांवर अवलंबून राहिल्याने ते सापेक्ष असतात. काही उरले असे म्हणणे किंवा उरले नाही असे म्हणणे हे दोन्ही सांतपणातून। मीपणातून येतात. म्हणून दोन्ही नाशिवंतच।

विश्व हे आत्मा-अनात्मा यांचे मिश्रण आहे. आत्मा अदृश्य तर अनात्मा दृश्य असतो. दृश्यामध्ये असण्यालाच आपण असणे समजतो.

उत्तमा सहजावस्था मध्यमा ध्यानधारणा।

©www.madhaveeraghuveer.com

२५ जुलै २०१८

येथे शुन्याचा निरास झाला। आत्मा सदोदित संचला
पाहो जाता साधकाला। ठावाचि नाही॥१५॥
अभिन्न ज्ञाता तोचि मान्य। साधक साध्य होता धन्य।
वेगळेपणे नृ निसून्य। पावती प्राणी॥१६॥

येथे शून्य मिथ्या ठरते. ते नाहीसे होते. मग सदैव प्रकाशमान असणारा आत्मा सर्व ठिकाणी व्यापून आहे असा प्रत्यय येतो. आत्मा प्रगट झाल्यावर साधकाला स्थानच उरत नाही.

जो ज्ञाता ज्ञेयवस्तुशी तदाकार होतो तोच खरा ज्ञाता होय. जो साधक आत्मस्वरूपाशी तादात्म्य पावतो त्यानेच खरे ध्येय गाठले. स्वस्वरूपाहून जोपर्यंत वेगळेपण आहे तोपर्यंत फार फार तर शून्यपणा आणता येईल.

आत्मस्वरूपाचे दर्शन होण्याच्या आधी दोन पायऱ्यांवर दोन प्रकारचे निरास व्हावे लागतात.

१. पंचमहाभूते, मन, बुध्दि, अहंकार या अष्टधा अपरा प्रकृतीचा किंवा दृश्याच्या निरास व्हावा लागतो. यात स्थूल व सूक्ष्म देहाचे मीपण सुटते. —— अपरा प्रकृति

२. यानंतर परा प्रकृतीचा / कारणदेहाचा म्हणजेच अविद्येचा निरास व्हावा लागतो.

कारणदेहाचा मीपणा सुप्त असतो, शून्यपणाने राहतो.

या तीनही देहांचा साक्षी जो आत्मस्वरूप तो सदैव प्रकाशमान असतो. साक्षीरूपाने तो विश्वाचा अंतर्यामी असतो. इथे साधकावस्था संपून सिध्दावस्थेला सुरूवात होते.

दृश्याच्या ज्ञानामध्ये ज्ञाता व ज्ञेय अलग असतात. पण आत्मज्ञानामध्ये ज्ञाता हा ज्ञेयाहून वेगळा राहू शकत नाही. तो ज्ञेयाशी अभिन्न / तद्रूप होतो. आणि असे समरस होणे हेच साधकाचे परम ध्येय असते.



©www.madhavaraghuveer.com

जो साधक आत्मस्वरूपाशी तदाकार होतो त्याचा 'मी' पण महाकारणामध्ये स्थिरावतो. तो विश्वमनाशी एकरूप होतो. अर्थात्च सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणाशी समरस होतो. सर्व देहांमध्ये आपणच राहतो अशी प्रचीती त्याला येते.

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।

साधकाला जोपर्यंत स्वस्वरूपाशी अशी समरसता साधत नाही तोपर्यंत तो स्वरूपाहून भिन्न राहतो. आणि त्या भिन्नपणाच्या वृत्तीला शून्य करण्यापर्यंत मजल मारता येते. परंतु ती अवस्था संपली की वृत्ती पुन्हा दृश्याकडे धाव घेते.

अभिन्नज्ञाता - त्रिपुटीरहित ज्ञानाचा अनुभव आलेला म्हणजेच 'शिष्य'।

ज्ञाता (मी) आणि ज्ञेय (पुस्तक) हे भिन्न असते. मला पुस्तकाचे ज्ञान झाले तरी मी पुस्तकापासून भिन्न असतो. म्हणूनच मी 'भिन्नज्ञाता' असतो.

परंतु जीवरूप जो मी आहे त्यातील चिदाभास हा कूटस्थ चैतन्यात एकरूप होऊन जातो त्यावेळी ज्ञाता हा ज्ञेयामध्ये विरून जातो म्हणूनच तो 'अभिन्नज्ञाता' होतो. त्याची जाणीव नसते. काय झाले ते समजत नाही. परंतु जे कळायला पाहिजे ते झालेले असते. त्यालाच म्हणतात - 'साक्षात्कार'

02 SUNDAY



© www.madhavveeraghuveer.com

वेगळेपणे पाहो जाता । मोक्ष न जोडे सर्वथा ।
आत्माही दिसेना ही मता । बरपडे होती प्राणी ॥ ७८ ॥

मोक्ष हा शब्द सापेक्ष आहे. आजच्या पराधीनतेच्या बंधनाच्या उलट मोक्षाची अवस्था असते.

| बंधन | मोक्ष |
| --- | --- |
| १. अल्पज्ञान, अल्पजीवन व अल्प आनंद असतो. | अनंत ज्ञान, अनंत जीवन व अनंत आनंद असतो |
| २. आयास, प्रयास, अभ्यास हव्यास व ध्यास असतात. | यापैकी काहीही नसते. (केवळ सहजता असते) |
| ३. नाशिवंत, अपूर्णपणा व अनेकपणा असतो. | अविनाशी, संपूर्णपणा व एकपणाचा अनुभव असतो. |
| ४. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्हींची प्रचीती येते. | या अवस्थांच्या पलीकडील तुर्यावस्थेचा अनुभव येतो. पुढे तोही विरून जातो. |
| ५. देश, काल, वस्तु यांच्या चौकटीतच ज्ञानाची प्राप्ती | या सर्वांचा लोप होऊन अनंताचे अनंत ज्ञान होते. |
| ६. स्वत: व्यतिरिक्त इतरांचे पुष्कळ ज्ञान होते. | स्वत:चे साक्षात ज्ञान होते. |
| ७. ज्ञान वेगळेपणाने होते. | वेगळेपणाने ज्ञान होऊ शकत नाही |
| ८. स्थूल व दृश्य वस्तुंचे ज्ञान. | सूक्ष्म व अदृश्य वस्तुंचे ज्ञान |

इंद्रिये, मन, बुद्धी आपापल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करतात. त्यांच्या सामर्थ्याचा प्रत्यय येतो. परंतु आत्मवस्तुचे क्षेत्र त्यांच्या कक्षेच्या पलिकडचे असल्याने तिथे ती लटकी पडतात. आत्मा अतींद्रिय असल्याने इंद्रियांना त्याचा अनुभव घेता येत नाही. आत्मा स्वसंवेद्य असल्याने मन, बुद्धि त्याला जाणू शकत नाही. उलट आत्मा स्वयंप्रकाशी असल्याने तोच जड अशा मन-बुद्धिला प्रकाश देतो.



© www.madhaveeraghuveer.com

OCTOBER 04
TUESDAY

आणि म्हणूनच दृश्यवस्तुंचे ज्ञान करून देण्यासाठी जी इंद्रिय, मन बुद्धि समर्थ असतात. ती साधने जेव्हा आत्मवस्तुचे ज्ञान करून देण्यासाठी सरसावतात तेव्हा आत्मा त्याना दिसत नाही. त्यातून आत्मा मुळीनाहीच हे मत तयार होऊन त्याचे पर्यवसान शून्यवादात होते.

शून्यवाद आणि संशयवाद ही थावंडे आत्मवादाची हानी करतात.

श्रय

© www.madhaveeraghuveer.com

आपुलिया डोळां जे देखिले। ते पंचभूतांमध्ये आले।
ऐसे जाणोनि दृढ धरिले। ते नाडले प्राणी॥१८॥
जो पंचभूतांचा दास। तयास मायेमध्ये वास।
भोगी नीच नव्या सावकास। पुनरावृत्ती॥१९॥

आपल्या डोळ्यांना जे जे दिसते ते ते सर्व पंचभूतांमध्ये येते. त्या पंचभूतात्मक देहाला जे दृढ धरुन बसतात ते फसतात.

जो दृश्याचा ताबेदार असतो त्याला मायेच्या राज्यात राहावे लागते. तिथे त्याला संथपणे नित्य नवे जन्म घेणे भोगावे लागते.

आत्मा दिसत नाही म्हणून तो नाही हे म्हणणे बरोबर नाही. आपली इंद्रिये आणि दृश्य पसारा हे सर्व पंचमहाभूतांपासूनच झालेले आहे. परंतु आत्मा हा पंचमहाभूतांना ओलांडून राहतो. ज्यांची दृष्टी इंद्रियांच्या पलीकडे जात नाही त्यांना आत्मदर्शन शक्य नाही. जे पंचभूतांमध्येच अडकतात ते फसतात.

खरे सुख आत्म्यामध्येच आहे. आत्मविस्मृतीमुळे जीव ते दृश्य वस्तुमध्ये शोधतो. तो दृश्याचा गुलाम होतो. अशा वृत्तीलाच वासना म्हणतात. आणि वासना हे मायेचेच आपल्या अनुभवाला येणारे रूप आहे. वासनेमुळेच पुन्हा पुन्हा जन्म मरण हे कालचक्र सुरु आहे.

उपनिषद आत्म्याचे वर्णन अवाङ्मनसागोचर करते.

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकः
नेमा विद्युतो भाति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्व
तस्य भासा सर्वमिदं विभाति।

©www.madhaveeraghuveer.com

OCTOBER 06
THURSDAY

पंचमहाभूतात्मक गोष्टींमध्येच सुख आहे अशी धारणा बनली की त्याचेच आकर्षण वाढू लागून वाढू लागते. तो पंचमहाभूतांचा दास होतो. त्यात रमून, रंगून जातो. त्यापलीकडे काही आहे, ते जाणून घ्यावे अशी ओढ वाटत नाही, त्यामुळे खऱ्या सुखाची प्राप्ती होत नाही वासना मात्र वाढत जातात. आणि मग तो साधक जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकत जातो. जन्म घेणे लागे वासनेच्या संगे - असे तुकाराम महाराज म्हणतात.

© www.madhaveeraghuveer.com

तो शिष्ये विनंती केली। म्हणे आशंका उद्भवली।
पंचभूतांची सेवा केली। बहुतेकीं ॥२०॥
सकळ सृष्टीमध्ये जन। साधु, संत आणि सज्जन।
करिती भूतांचे भजन। धातु पाषाण मूर्ति॥२१॥

स्वामींचे म्हणणे ऐकून शिष्याने आशंका घेतली. त्याने विचारले की बहुतेक लोक पंचमहाभूतांचीच तर सेवा करतात ना! जगामध्ये सर्व समाजातील सामान्य माणसे तसेच साधु, संत आणि महानुभाव हे पंचमहाभूतात्मक अशा धातुच्या किंवा पाषाणाच्या मूर्तिंचीच सेवा व उपासना करतात.

तेव्हा मग पाषाणाच्या विठ्ठलमूर्तीची उपासना करणारे थोर थोर संत हे अज्ञानी म्हणायचे का? त्यांना पंचभूतांचे दास मानायचे का? आणि सगुण उपासना करणाऱ्यांना नेमके काय मिळते? लौकिकामध्ये ज्या गोष्टींचे महत्त्व वाटते अशा सत्ता, संपत्ति, प्रतिष्ठा, यश, कीर्ति त्यांना मिळते का?

आणि जर तसे काही समजा मिळत नसेल तर त्या अभावाने त्यांच्या परमार्थाला जोर चढतो का? किंवा भौतिक गोष्टींच्या प्राप्तीने, श्रीमंतीमुळे त्यांची भक्ती, परमार्थ त्रिगुणित होतो का?

तर, खरे तर असे काहीच नसते. योगी किंवा उत्तम भक्त असे, कोणत्या विशिष्ट परिस्थितीत घडतात असेही म्हणता येणार नाही. मलबार हिल वा धारावी । दोन्हींमध्ये संत निर्माण होतात असा अनुभव नाही. संतांच्या या ऐहिक संपत्तिशी काहीच संबंध नाही. त्यासाठी पारमार्थिक (दैवी) संपत्ति हवी

पंचमहाभूतांची मूर्ति हे केवळ माध्यम आहे. त्यातून पूजा करायची ती निर्गुण निराकार परब्रह्माची



© www.madhaveeraghuveer.com

सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे।

अद्वैतातील भक्ति क्रियेवाचून असते. परंतु ते समजून घ्यायला हवे.

आईचे मुलावरील, पतिव्रता स्त्रीचे पतीवरील प्रेम क्रियेतूनच व्यक्त होते. असे असले तरी प्रेम हे क्रियेतून व्यक्त होत असले तरी क्रियेत प्रेम असतेच असे नाही.

हॉटेल मधील पदार्थ उत्तम असले तरी त्यात तो जिव्हाळा नाही.

गणिका जरी त्याच क्रिया करत असली तरी त्यात बाजारुपणा असतो. समर्पण नसते

* परंतु याची दुसरी बाजू अशी की क्रियेत सापडणे म्हणजे पंचमहाभूतात सापडणे पूजा, गंध, फूल, अक्षता, धूप, दीप ----

'दारिद्र्यात परमार्थ फुलतो' हे काही तितकसे खरे नाही.

परमार्थ फुलायला हवी ती दैवी। पारमार्थिक संपत्ती

'आत्माराम' हा निर्गुण प्रधान ग्रंथ आहे. शिष्याची निर्गुणाकडे प्रवृत्ती व्हावी यासाठी गुरु

09 SUNDAY सगुणाविषयीच्या शंकांचे निरसन करत आहेत.

©www.madhaveeraghuveer.com

केला मातीचा पशुपती । पशुपती नव्हे माती
शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी सामावे ॥



जे कोणी नित्यमुक्त झाले । ते ही धातुपूजन केले ।
तरी ते पुनरावृत्ती पावले । किंवा नाही? २२॥
ऐसा शिष्याचा अंतर्भाव । जाणोनि आनंदला गुरुराव ।
म्हणे सांग्राचे हा अनुभव । पावेल आता ॥२३॥

जे अवतारी संत झाले, त्यांनी देखील धातुच्या मूर्तिचे पूजन केले तर मग ते या जन्म मृत्युच्या पुनरावृत्तिमध्ये अडकले का? का मुक्त झाले?

शिष्याच्या मनातील भाव ओळखल्यामुळे सद्गुरु आनंदित झाले. आता या निमित्ताने शिष्याला सगुणाचे वर्म समजावून सांगावे व त्यानंतर निर्गुण उपासनेची मातडी सांगता येईल.

जो दृश्यामध्ये रमतो त्याला जन्ममरणाचे चक्र पाठीमागे लागते. हे खरे आहे काय? मग मूर्तिपूजा करणाऱ्या संतांचे काय झाले? तर त्याचे उत्तर आहे की त्यांचे तसे नसते, ते त्यामागील भाव पाहतात.

सगुणाचेनि आधारे निर्गुण पाविजे निर्धारे ।

केली काशाची जगदंबा । जरि कासे नव्हे अंबा ॥

सामान्यजन मूर्तित रमतात. संत त्यात रमत नाहीत. ते केवळ आलंबन म्हणून मूर्तिकडे बघतात. खरा देव किंवा समर्थांच्या भाषेत थोरला देव सर्वत्र आहे.

सुंदर आहे तसा कुरूप देखील आहे. शांत आहे तसा रौद्रही आहे. भीति हरण करणारा आहे तसाच भीति दाखवणारा देखील आहे. तो भयकृत पण आहे आणि भयनाशनही आहे. ओंगळ, भयानकातही तो आहेच. सौंदर्यात तर तो आहेच.

रामकृष्ण परमहंसांना भुलवण्यासाठी त्यांच्या हितशत्रूंनी एका नर्तकीला त्यांच्याकडे पाठवले. तेव्हा त्यांनी तिला वंदन करून विचारले, "माते, आत्ता मंदिरात तुझे वेगळे रूप



© www.madhaveeraghuveer.com

पाहिले होते. आता तुला हे रूप घ्यावेसे वाटले का?,
या ही रूपामध्ये जगदंबाच दिसते आहे.

शिष्याचा प्रश्न जरी बोचक असला तरी गुरुंना आनंद झाला — आता याच्या बुद्धीची योग्यता इतकी झाली आहे की आता अनुभव यायला वेळ लागणार नाही. हा लवकरच निश्चयापर्यंत पोहोचेल.

© www.madhaveeraghuveer.com

ऐसे विचारूनिया मनी । कृपादृष्टी न्याहाळुनी ।
शिष्याप्रती सुवचनी । स्वामी बोलते झाले ।। २४ ।।
प्राणी देह सोडून जातो । परी वासनात्मक शरीरे उरतो ।
तेणे पुनरावृत्ती भोगितो । वासना उरलिया ।। २५ ।।

गुरूंनी आपल्या शिष्याकडे अत्यंत प्रेमाने पाहिले आणि त्यानंतर मधुर वाणीने बोलू लागले.

खरे सद्गुरु शिष्याच्या कोणत्याही शंकेचा उपहास वा उपमर्द करीत नाहीत. उलट आपल्या प्रेमळ दृष्टीने, स्पर्शाने आणि शब्दांनी त्याच्या संशयाचे निरसन करतात. आणि आपल्याजवळचे ज्ञान शिष्याच्या अंतःकरणात संक्रमित करतात. ते सांगतात — — —

प्राण्याचा जीव स्थूल देह सोडून जात असला तरी तो त्याच्या सूक्ष्म देहाने जिवंत असतो. त्याच्यात ज्या वासना शेष उरलेल्या असतात त्यामुळे जीवाला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात. माणसाचा स्थूल देह हा केवळ दर्शनी भाग आहे. खरा माणूस त्याच्या सूक्ष्म देहात सापडतो. माणूस दिसतो कसा त्यापेक्षा तो असतो कसा! हे अधिक महत्त्वाचे आहे. सूक्ष्म देहामध्ये वास करणाऱ्या वासनांची पूर्ति करण्यासाठी स्थूल देह निर्माण करतात. तरीसुद्धा सर्व वासनांची तृप्ती होतच नाही. उलट काही नव्या वासना निर्माण होतात. त्यातून पुन्हा नवीन जन्म मिळतो. स्थूल देह जीर्ण होतो. पण सूक्ष्म देह ताजातवाना राहतो. जन्म मृत्यूचे हे चक्र चालतच राहते.

सर्वसामान्य माणसे जे काही सत्कर्म करतात त्यामागे थोडीतरी वासना असतेच. त्यातून काहीतरी मिळवायचे असते. त्या वासना त्याला पुनरावृत्तीच्या फेऱ्यात घालतात. व पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात.

जरी न चुकतो वर्म । तरी न पावतो श्रम।

— संत तुकाराम

एकवेळ माझं चुकलं. आता तुम्ही तरी चुकू देऊ नका. माझं जर वर्म चुकलं नसतं तर मला साधनेमध्ये अनावश्यक त्रास जो झाला तो झाला नसता. किंबहुना या दुःखदायक फेऱ्यामध्ये अडकावेच लागले नसते.

वर्म जाणल्यानंतर की धमछाक होत नाही. जीवन्मुक्तांना जग दिसत नाही असे नाही. परंतु त्यांनी त्याचे मिथ्यत्व ओळखलेले असते.

आईन्स्टाईन - World is illusion. अर्थात प्रत्येक गोष्ट ही Matter आहे. त्यात Molecules आहेत. त्यात atoms असतात. त्यात particals असतात. आणि ती सतत फिरत असतात. बदलत असतात. गतिमान असतात आणि म्हणूनच शाश्वत (स्थिर) नसतात. म्हणून जग हे भ्रमरूप आहे. त्याच्यावर आसक्ती ठेवू नका. आसक्ती / संग सुटला तर वासना उत्पन्न होणार नाही. वासनाक्षय झाला की जाणे-येणे चुकले.

© www.madhaveeraghuveer.com

मूळ या स्थूळ देहाचे । लिंग देह वासनात्मक साचे ।
राहणे तया लिंगदेहाचे । अज्ञान देही ॥२६॥
कारणदेह तोचि अज्ञान । आणि तो मी आत्मा ऐसे ज्ञान ।
तया नाव महाकारण । देह बोलिजे ॥२७॥

जीवाचे शरीर सुटले तरी वासना टिकून रहाते. त्यामुळे चक्राकार गतीने वासनापूर्तिसाठी शरीरे मिळत रहातात. शरीर म्हणजे मी नाही, तसेच मन / बुध्दि इत्यादिक मी नाही. मी आत्मा आहे याची यथार्थ जाणीव झाली की मायासमुद्र आटून जातो.

जो भक्तीच्या माध्यमातून साधना करतो त्याच्या सर्व वासना रामरूप होऊन जातात, मग काहीच शिल्लक रहात नाही.

जो तत्वज्ञानाच्या माध्यमातून साधना करतो त्याच्या सर्व वासना ब्रह्मरूप होतात. तो सहजच निर्वासन होऊन जातो.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते ।

वासना सरून गेल्या की पुढच्या शरीराची व्यवस्था करावी लागत नाही. जीव मुक्त होऊन जातो.

मात्र जोपर्यंत वासना असतात तोपर्यंत सेवादेखील वासना घेऊन येते. त्यातून काहीतरी मिळवण्याची (पुण्य का असेना) इच्छा / भावना उरते. चांगले / वाईट हे सापेक्ष आहे. शेवटी वासना पुनरावृत्तीच्या फेऱ्यात घालतातच.

सूक्ष्म देहाच्या आत वासनात्मक देह असतो, तो अतिशय सूक्ष्म असून अज्ञान हे त्याचे अधिष्ठान असते. त्यालाच लिंगदेह म्हणतात.

इथे बीज स्थूळ असते. वटबीजातून वडाचेच झाड उगवते. कोयीतून आंबाच उगवते.



©www.madhaveelagni.com

काव्याचे श्री | कडुनिंबाच्या लिंबोण्या |

लिंगदेहाच्या आत अज्ञान हे मूळ कारण असते, आणि 'मी आत्मा आहे' ही जाणीव म्हणजे महाकारण आहे.

आता प्रश्न असा येईल की ही जाणीव (मी आत्मा) अज्ञानाचे प्रतीक किंवा द्वैताचे द्योतक कशी? त्याचे स्पष्टीकरण ——

अज्ञान आणि ज्ञान हे सापेक्ष शब्द आहेत

अज्ञानाच्या क्षेत्रात —— स्थूल सूक्ष्म व कारण देह

ज्ञानाच्या क्षेत्रात —— महाकारण देह.

अज्ञानात तर द्वैत असतेच परंतु ज्ञानदशेमध्ये 'मी तोच आहे' अशी अद्वैताची संकल्पना असते, देह म्हणजेच आत्मा ही जाणीव दृढ होते, आणि 'देह' ही संकल्पना मायेच्या क्षेत्रातील असल्याने ती अज्ञानाचेच प्रतीक ठरते, त्यातूनही द्वैतभावच निर्माण होतो.

© www.madhaveeraghuveer.com

तरी मनाचा थारा तुटला । म्हणिजे भवसिंधु आटला ।
प्राणी निश्चितार्थे सुटला । पुनरावृत्ती पासुनी ॥२८॥
हेचि ज्ञान भक्तीचे फळ । जेणें तुटे संसारमूळ ।
निःसंग आणि निर्मळ । आत्मा होईजे स्वयें ॥२९॥

हे सगळे मनाचे खेळ आहेत. ज्याचे मन उन्मन झाले त्याची सर्व जाणीव जाते. मनाचा थारा तुटला म्हणजे मनाचेही भान नसते. अमन, उन्मन
मी आत्मा आहे ही जाणीवही लोप पावते. मग स्थूल, सूक्ष्म, कारण, किंवा देह तर संपूनच जाते.

मात्र त्यासाठी समर्पण हवे. भक्ती हवी, भाव हवा. भावबळे आकळे । एरवी नाकळे ॥

भावाच्या रहाणा जवळचा आहे बिधिचा दूरचा आहे. सगुणोपासनेने [आकळावा श्रीपती भावबळे] ठायीच बैसोनि करा एकचित्त ॥

मात्र सगुणोपासना निरपेक्ष असावी ।
त्यात काही मिळवायचे नाही

मानसपूजेमध्ये मनानेच वैभव अर्पण करायचे, भव्य दिव्य पूजा करायची. प्रत्येक उपचार मनापासून (षोडशोपचार)

ग्रासाग्रासी भाव । नैवेद्य देईच जेवी देवा ।
परंतु भाव शुद्ध हवा, व्यापक हवा ।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥
आत्मौपम्य भाव हवा.
आत्मनो प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् ।
परमार्थातील वर्म ज्याला कळले त्याचा प्रवास सोपा होतो. यः पश्यति स पश्यति ।
प्रचीत पाहिजे जे शहाणे ॥



© www.madhaveraghuveer.com

OCTOBER TUESDAY 18



पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
(वस्तूच्या आकाराला महत नाही.
केवळ भावभक्तीच्या बळावर मनबुद्धि शुद्ध होते. वृत्ति निःसंग, आसक्तीरहित होते. निर्मळ, शुद्ध भाव जागतो.
'मी तुझा आहे' पासून 'मी म्हणजे तूच' हा भाव दृढ होत जातो. देहभाव विलीन होतो.

© www.madhaveeraghuveer.com

संगातीत म्हणिजे मोक्ष। तेथे कैचे देखणे लक्ष।
लक्ष आणि अलक्षाच्या दोहींस ठाव नाही ॥३०॥
आत्मा म्हणोनी देखणी आस मिठी।
घालू जाता मोक्षाची तुटी।
म्हणोनिया उठाउठी।
आत्मनिवेदन करावे ॥३३॥

बंधनरहित, मायामलरहित असे आनंदस्वरूप म्हणजेच मी आहे. असा साक्षात्कार भावबळाच्या जोरावर प्राप्त होतो.

आता त्याच्या पुढची पायरी।
साक्षात्कार म्हणजेच मोक्ष।

मोक्ष म्हणजे निःसंग होणे - आसक्ती संपणे

न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले।
मोक्षो हि चेतो विमलं सम्यक् ज्ञानविबोधितम्॥

निर्मळ ज्ञानाने पवित्र झालेले, विकसित झालेले विवेकी, विचारी अंतःकरण म्हणजे मोक्ष आहे.

इथे समर्थ तेच सांगतात ⟶ संगातीत
कुठे ही मुद्दाम लक्ष द्यायचे नाही.
काही प्राप्त करायचे नाही.
काही जाणायचे नाही.

पहाणारा, जे पहायचे ते व पाहण्याची क्रिया संपते
द्रष्टा —— दृश्य —— दृश्य — निरास.
समर्पण / आत्मनिवेदन हवे.

जे काही आहेस ते तूच आहेस मी नाहीच. असा मी विरून जायला हवा. आणि जे काही कार्य माझ्याकडून घडते आहे. जो कोणी 'मी' आहे तो तुझ्याच सत्तेने / इच्छेने आहे
मला स्वतंत्र अस्तित्व नाही.



©www.madhavraghuveer.com

मेरा मुझमें कुछ नाही, जो कुछ है सो तोरा।
तेरा तुझको सौंपत, क्या लागत है मोरा॥

अशी भावना मनापासून व्हायला हवी.

त्वदीय वस्तु गोविन्द, तुभ्यं समर्पये॥

शरीर हे काही काळापुरते घेतलेले भाड्याचे घर आहे. Leave & Licence मुदत ठरून नाहि

तुझी इच्छा तुझे बळ। मी तो बाहुले केवळ।

दृश्य गोष्टीला आत्मा समजून मिठी घातली तर मोक्ष मिळणे दूरच राहील. त्यात तो आहेच परंतु त्यापलीकडे ही तो आहेच. तो विश्वात्मक आहे तसा विश्वातीत आहे

© www.madhaveeraghuveer.com

प्राप्त झाले अद्वैत ज्ञान। अभिन्नपणे जे विज्ञान।
तेचि जाण आत्मनिवेदन। मी तूंपण नाही॥३२॥
ऐसी स्थिती जया पुरुषाची। तया पुनरावृत्ति कैची।
आणोनि भक्ति केली दासाची। आवडी देवास अत्यंत॥
॥३३॥

आत्मनिवेदनात मी-तूपण शिल्लक रहात नाही, मी तूपणाची ओळख होते.
केवळ तूच उरतो. मी तुझ्यात लीन होतो. मिळून जातो. हे खरे अद्वैत। अभिन्नता।
पतिव्रता स्त्री जशी पतीमध्ये पूर्णपणे समर्पित होते.

गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या
ललिते कलाविधौ।
भोज्येषु माता शयनेषु रम्भा
गृहिणी गृहमुच्यते॥

भक्त भगवंताचे माते असे असते.
अहं भक्तपराधीनः असे भागवत म्हणतात, अभिन्नपणे आत्मनिवेदन आहे.
अशा पुरुषाला पुनरावृत्ति नाही. समर्थांना दास्यभाव अधिक प्रिय आहे. भगवंताजवळ जाताना दास्यभावाने जावे. त्याने कसे वागावे। स्वीकारावे याची त्याला मोकळीक आहे.
सेवक शब्द काही कमीपणा दर्शवित नाही, मात्र तो दिखाऊ नसावा. प्रामाणिक असावा.
प्रधानमंत्री —— प्रधान सेवक.
समर्थ स्वतःला रामदास म्हणवून घेत.
जो दास्यभावाने भगवंताला शरण जातो तो भगवंताला प्रिय होतो.



© www.madhaveeraghuveer.com

ज्ञानाने - भक्ती ही जाणून करावी.
देव काय आहे? मी कोण आहे?
त्याचे / माझे नाते कसे आहे?

वस्तुतः मी देवरुपच आहे. पण अज्ञानामुळे अविद्येच्या प्रभावामुळे मी जीव आहे, असे मला वाटायला लागले. तो जीव ज्या देहात राहतो त्या देहाविषयी ममत्व वाटू लागले.

त्यामुळे मी खरा मुक्त असूनही स्वतःला बद्ध समजतो आणि या कल्पित बंधनापासून सुटका करून घेण्यासाठी म्हणजेच मोक्षासाठी मला प्रयत्न करावे लागतात. आणि हीच आहे 'साधना'! ही जाणून घेऊन करावी.

© www.madhaveeraghuveer.com

पूर्वी दास्यत्व होते केले। त्याचे स्वामित्व प्राप्त झाले।
आणि त्याचे महत्त्व राखिले। तरी थोर उपकार की॥
आता असो हे बोलणे। नाशिवंताचा विचार घेणे॥३४॥
आणि मजपाशी सांगणे। विचार आपुला॥३५॥

पूर्वी दास होता. आता अधिकार प्राप्त झाला, स्वामित्व मिळाले तरी त्याचा दास्यभाव त्याला सोडवत नाही. ही सर्वात चांगली गोष्ट आहे. हा समर्थांचा स्वानुभव आहे.

कारण शेवटी उद्धार व्हायचा आहे तो स्वामित्वाच्या नाही तर नम्रतेच्या कल्पनेतून व्हायला हवा.

आणि ज्या मार्गाने तुम्ही चढून आलात तो नष्ट करण्यात काय भूषण आहे? इतरांसाठी तो उपयोगी ठरू शकतो.

जाळू नये नाव। पावलेति पार।
मागील आधार। बहुतांचा॥

आपण पलीकडच्या तीरावर गेल्यावर आपली स्वतःची नाव जाळून टाकणे योग्य होईल का? तुम्हाला जरी नसेल तरी कुणाला तरी त्या नावेमुळे तरून जाता येईल. आणि म्हणूनच संत त्याचे रक्षण करतात.

परंतु आता पुन्हा पुन्हा तेच तेच बोलण्यात काय अर्थ आहे? आता तू केवळ नाशिवंत काय आहे, त्याचा विचार कर आणि मग तुझा अनुभव काय आहे ते मला सांग.

©www.madhaveeraghuveer.com

2016
SEP

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | |

OCTOBER 25
TUESDAY

झाले साधनाचे फळ संसार झाला सफळ।
निर्गुण ब्रह्म ते निश्चळ। अंतरी मिळाले॥

© www.madhaveeraghuveer.com

आता शुध्दक्रिये समासी। शिष्य सांगेल अनुभवासी।
हठ करुनिया त्यासी। सांगती स्वामी॥३६॥
इति श्री आत्माराम। रामदासी पूर्णकाम।
एका साधन वर्म। आत्मज्ञानाचे॥३७॥



© www.madhaveeraghuveer.com

१२ जुलै २०२२
आषाढ शुध्द चतुर्दशी
३ रा गुरुपौर्णिमा

- आत्माराम -
- समास - ५ वा -
- स्वानुभव निरूपण -

जय जयाजी स्वामी सर्वेश्वरा।
आम्हा अनाथांचिया माहेरा।
सार्थक जाले जी यातारा।
तुमच्या कृपाकटाक्षे॥१॥

शिष्य सद्‌गुरुंना आपल्या मनातील प्रश्न मोकळेपणाने विचारतो आहे. क्वचित Cross Question करत आहे. कारण त्याला निःसंदेह व्हायचे आहे. आता मनात कोणतीही शंका/संशय नको. त्यामुळे क्वचित गुरुंच्या आधिक्षेप होतोय की काय, असे वाचकाला वाटू शकेल. परन्तु तसे नाही. ज्ञानदृष्टीने विचार केला तर आता शिष्य जवळ जवळ गुरुंच्या स्थानापर्यंत पोहोचला आहे. परंतु पूर्णत्व पावलेला नाही. अशा वेळी कधीकधी गुरु हे शिष्याबरोबर चर्चा करतात. काही बाबतीत त्याचे मतही विचारात घेतात. त्याला बरोबरीचे स्थान देतात.

परंतु या सलगीमुळे खरा शिष्य चढून जात नाही. तो त्याची पायरी ओळखून असतो. अंतिम मुक्काम आता दृष्टीपथात आलेला असला तरी अजून पोहोचलेला नाही. ज्ञानाची चतुर्दशी असली तरी ती, काही पौर्णिमा नाही.

चतुर्दशीचा चंद्र पूर्णत्वासारखा दिसत असला तरी त्यात एक कला कमी आहे. आणि हीच ती शिष्याची अवस्था आहे. जे ज्ञान प्राप्त झाले आहे, ते सद्‌गुरुकृपेने प्राप्त झाले आहे. कोठे पैसा लागला घेऊया सांगो मु..।

सत्शिष्य सद्गुरुंची स्तुती करतो आहे.

शिष्य सद्गुरुंचे महात्म्य जाणतो. त्याची नम्रता सुटलेली नाही. तो पूर्ण झाला आहे. अनुभवाला पोहोचला आहे. त्यामागे सद्गुरुंची प्रेरणा आहे. त्यांचे आशिर्वाद/उपदेश आहे.

गुरुंनीच त्याला अनुभव घ्यायला सांगितले होते. आता स्वानुभव घेत घेत तो मुक्कामाच्या थोडा अलीकडे आलेला आहे. म्हणून तो सद्गुरुंच्या महिमा वर्णन करतो आहे.

शिष्य नमन करत आहे. मन समर्पण करावं देवाच्या इच्छेने वर्तावे देव करील ते मानावे॥

देह बुद्धीच्या किनाऱ्यावर बसून आत्मज्ञान मिळणार नाही. मन/बुद्धीचे लगाम त्यांच्या हातात द्यायचे. देव आणि सद्गुरु निराळे नाहीत.

☆ आग्रह, संग्रह, पूर्वग्रह संपून जाते. (परिग्रह)

बँकेचा Locker - Manager ची किल्ली
सद्गुरुकृपा

आपली किल्ली - वासनाक्षय

आता सद्गुरु स्वरूपस्थितीचा लाभ होतो.

सद्गुरु - गजराचे घड्याळ. Derail झालेली गाडी रुळावर आणतात.



देवापेक्षा ही श्रेष्ठ। ते स्वतः परीस तर आहेतच पण दुसरा परीस बनवू शकतात.

सूचक - अप्रत्यक्षपणे देहाची गती समजावतात. आत्मज्ञान

दर्शक - खाचखळगे/धोक्याच्या जागा समजावतात.

बोधक - बोध (तावळीचा डोक्यावर नाही तर स्व-डोक्यावर हित)

 प्रेरक - तस्मात जाग्रत जाग्रत — जागवणारे.

Group of Words descended above.



देहबुद्धी → देशबुद्धी → देवबुद्धी — प्रवास
यात सातत्य हवे. नाहीतर मग बंधच आवडू
लागतो. त्याची इथाकडे प्यार कोठडी
कोठडीतले सर्व सवंगडी
हातकडी की अवजड बेडी
प्रिय होते त्याची त्याला ॥

✱ भक्ती, सक्ती, शक्ती संपते तिथे भक्तीका महल
तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन --

अनुग्रह —
दीक्षा — दी म्हणजे देणे क्षा म्हणजे पचवणे.
इथे घाई / जबरदस्ती चालत नाही.
साक्षात्कार Step by step जायचे आहे.
धीरे धीरे रे मना ---
ध्यानात निष्ठा हवी. ध्यानात गती नाही तर
स्थिती आहे.
सद्गुरूंची आवश्यकता —

Railway प्रवासी - Without ticke
Reservation (शांतचित्त)

यत्पादरेणुकणिका कापि संसारवारिधेः
सेतु बन्धायते नाथं देशिकं तमुपास्महे ॥५५॥
गुरुचरणांची धूळ मस्तकी लावावी.

चित्रकूटावर भरत
शिवथरघळ - शंकरराव देव
भाऊसाहेब महाराज - गुंड्या
शंकराचार्य — गिरी
समर्थ — कल्याण.



© www.madhaveeraghuveer.com

पिता पुत्राप्रमाणे गुरु शिष्याचे नाते आहे.

ऐसा सद्गुरु पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी ।
देहवीण लोटांगणी ।

सद्गुरुंची दृष्टी अवगुणपरिमार्जक असते.
साध्या डोळ्यांनी हृद्यातील कोणी दिसत नाही

प्रक्रिया — उपासनेची भट्टी
साधकाची वितळण (अंतरंगाती)
एकांतात स्वस्थ
विवेकाची रवी (मेळमडळा)
इडा पिंगला हे दोर
घुसळण । सगळी भावाने पहायचे.
तेव्हा आत्मतत्त्वाचे नवनीत मिळते.

पुष्पे गन्धं तिले तैलं काष्ठे वह्निः पयो घृतम् ।
इक्षौ गुडं तथा देहे पश्यात्मानं विवेकतः ॥

मी माझे मावळो सर्व । तू तुझे उगवो आता ।
मी तू पण जगन्नाथा । होवो एकचि तत्त्वता ॥

या मनाचेनि संगाती । जन्म घेतले पुनरावृत्ती ।
मायामाजि असोन भ्रांती । वरपडा जालो होतो ॥

शिष्याला अनुताप होतो आहे. या मायेच्या तावडीत सापडून मी माझे कसे नुकसान करून घेतले हे आठवून त्याला खेद वाटत आहे.

शिष्य आपला स्वानुभव सांगत आहे.

जे खरे नव्हतेच, जो आभास होता त्याला मी भुललो. बाह्य अवडंबराचा मला मोह पडला.

या मोहाने, अज्ञानाने मला सद्वस्तूच्या स्वरूपाचा विसर पडला. मी वहावत गेलो. आणि जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडलो.

असे कितीतरी जन्म वाया गेले असते.

पण Thank God!

मजवर सद्गुरुकृपा झाली. माझ्या आयुष्याचे सोने झाले.

लोहो परिसासी लागला । थेंबुटा सागरी बुडाला ॥

जो मी मानवी किंकर । येकायेकी जालो विश्वंभर ।
संदेह तुटला थोर । यातायातीचा ॥

मी आधी यः कश्चित सामान्य मनुष्य होतो. परंतु आपल्या कृपाकटाक्षाने मला कृतरूपता प्राप्त झाली. माझ्या मनातील संशयाच्या गाठी पूर्णपणे उकलल्या. आहे किंवा नाही? असे की नसे? हा संभ्रम पूर्णपणे संपून गेला. आता यातायातीत जाणे येणे नाही. दगदग/धावपळ नाही.

आता स्वरूपस्थितीमध्ये केवळ विश्राम आहे.



©www.madhaveeraghuveer.com

मी संसारीहून सुटलो । पैलपार पावलो ।
मीच सकळ विस्तारलो । सर्वांभूती ॥८॥

मी करून अकर्ता । मी परेहून परता ।
मनामध्ये वार्ता । मीपणाची नाही ॥९॥

तोपर्यंत हा संसार मला खरा वाटत होता. माझा वाटत होता, तोपर्यंत या मायेच्या चक्रात मी भोवंडत होतो. हेलपाटत होतो. मला त्याचा शीण होत होता. परंतु जेव्हा आपली कृपा लाभली तेव्हा मी विश्वंभर झालो. या चराचरात मीच भरून राहिलो. माझे स्वतंत्र अस्तित्व सरून गेले.

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥

सर्व भूतमात्र म्हणजे माझाच विस्तार आहे. त्यांच्यात व माझ्यात अभेद आहे. मी वेगळा नाही.

ऐलतीरावर होतो म्हणजे जेव्हा मायेच्या प्रभावाखाली होतो तेव्हा मी स्वतःला या ब्रह्मांडापासून वेगळा समजत होतो. अर्थातच तेव्हा मी द्वैतात वावरत होतो. संकुचित होतो.

मात्र जेव्हा पैलतीरावर पोहोचलो तेव्हा उपाधी संपून गेल्या. देहबुद्धीचा नाश झाला. मी व्यापक झालो.

या विश्वाच्या कणाकणातून
भरून राहिले अवघे मीपण
आपणाचे मी गाय लाविले ।
आज हृदय मम विशाल झाले ।
त्यात पाहुनी गगन लाजले ॥

मी माझे मावळते सर्व।



एकनाथ महाराजांना जे गाढवात, नामदेव महाराजांना जे कुत्र्यात ब्रह्मस्वरूप दिसले ते जेव्हा मलाही दिसायला लागते तेव्हा मी ब्रह्मस्वरूप होऊन जातो. माझ्या विस्ताराला अंत रहात नाही. Circle without circumference अशी अवस्था होते. मग तिथे कुठला मी? अन कुठला तू?

मी तू पणाची बोळवणच होते. सगळीकडे त्या एकाचाच साक्षात्कार होतो.

जोपर्यंत मी मावळत्याच्या विश्वात स्वतःला पहात होतो तोपर्यंत माझ्याकडे कर्तेपण होते आणि त्या कर्तेपणापाठोपाठ भोक्तृत्वही होते.

मात्र त्यामुळेच कामाचा शीण/थकवा जाणवतो. ∴ सगळा भार त्याच्यावर सोपवायचा.

मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी।
राम कर्ता ऐसे म्हणसी। यश कीर्ति प्रताप॥

कबीरजी तर नामाचे श्रेयही रामालाच देतात.

राम हमारा जप करे। हम बैठे आराम॥

एका विदेही साधूला प्रश्न केला —
क्या ब्रह्म जानते हो?
उत्तर — जानना क्या है। ब्रह्म ही तो हूँ॥

06 SUNDAY

एकदा का आत्मज्ञान झाले, गन्तव्य स्थानापर्यंत पोहोचलो की मग येरझारा संपतात.

विस्तारलो सर्वांभूती। ही भावना होते.

किं ज्योतिस्तव - - - - -



ऐसे जे निजबीज। गाभिण मीपणाचा फुंज।
तो मुरालिया सहज। सिद्धीचे आदिजे ती॥६॥
ऐसा शिष्याचा संकल्पु। जाणोनि बोले मनरिपु।
संसारसर्प भ्रमदर्पु। केला जेणे ॥७॥

असे जे निजबीज आहे. ते सहजासहजी दिसत नाही. त्यावर मीपणाची फुंज (फेस) असते. त्याचा डोलारा इतका मोठा असतो तो असतो अहंकाराचा फुलोरा, पिसारा, डांगोरा। त्याच्या दणादणाटापुढे हे निजबीज कूटस्थ चैतन्य लपल्याप्रमाणे होते. खरं तर हे चैतन्य म्हणजेच सर्वांना चालना / प्रेरणा / स्फूर्ति देणारे तत्त्व असते. ते सर्व करून अकर्ता, सर्व भोगून अभोक्ता असा असतो.

अहंकाराच्या खळखळाटापुढे ही इवलीशी ज्योत पटकन दिसत नाही, जाणवत नाही. परंतु एकदा ही अहंकाराची रोषणाई कमी कमी होत बंद झाली की मग या ज्योतीचे महत्त्व ध्यानात येते. गीतोपदेश करून झाल्यावर भगवंत म्हणतात- अर्जुना तुला हे जे अर्जुनपण चिकटले आहे ते काढून टाक. म्हणजे मग तू आणि मी एकच आहोत हे तुझ्या ध्यानात येईल. मूळ जे बीज आहे ते चैतन्यच आहे. चैतन्याला दुजेपण नाही. तिथे द्वैत नाही. तिथे अभेद आहे, अद्वैत आहे.

आणि अभेद म्हणजेच एकरूपता यथार्थपणे जाणणे म्हणजेच ज्ञान आहे. जोपर्यंत जीव भेदाने वावरत असतो तोपर्यंत चैतन्यापासून अनभिज्ञ असतो. परंतु बाह्य देखावा, डोलारा नाहीसा होतो तेव्हा हे मीपण ब्रह्मामध्ये मुरते.

अहं ब्रह्मास्मि- याचा स्थूल अर्थ जरी 'मी ब्रह्म आहे' असा असला तरी त्याचा गुह्य

अर्थ आहे — ब्रह्म आहे, मी नाही
अस्तित्व आहे ते केवळ ब्रह्माला! मला
अस्तित्व नाही. आणि जर मीच नसेन तर मग
मी मला चिकटवलेली सारी बिरुदे
शिल्लक रहाणारच नाही. मी सुंदर, श्रीमंत, विद्वान,
जाणणारा, कर्ता, भोक्ता — हे काही उरतच नाही.
मी कर्ता ही भूमिका संपून जाते. बंध
तुटून जातात. वासना क्षय होतो. मी मोकळा होतो.
आतील कूटस्थ चैतन्य आहेच. त्याला आदि-अंत
नाही, विकार नाही, ते निश्चल असते. केवळ
आतापर्यंत झाकलेले होते ते आता ज्ञात झाले.

⑥ शिष्याचे वचन ऐकून गुरुजींना संतोष
झाला. ते सुखावले आणि म्हणाले —
बरे झाले! याच्या अहंकारामुळे, त्याच्यामुळे
याने जो संसार गोळा केला होता, तो आता
पूर्ण गेला. हा संसार अविद्येतून निर्माण झाला
आहे आणि अविद्या ही सुविद्येपर्यंत पोहोचू
देत नाही.

स्फुरे ब्रह्म ते जाण माया सुविद्या।

संसार हा सर्पाप्रमाणे जीवाला वेढून टाकत असतो.
मोक्षाच्या मार्गातील हा भवरिपु आहे.

©www.madhaveeraghuveer.com

जे स्वामींच्या हृदई होते। ते शिष्यासी बाणले।
जैसे सामर्थ्य परिसाचे। लोहो अंगी बाणे॥ अवचिते॥ ५॥
स्वामी परिसाचा स्पर्श होता।
शिष्य परीसचि जाला तत्वता।
गुरुशिष्याची ऐक्यता। जाली स्वानुभवे॥ ६॥

गुरु शिष्यांमध्ये एक पातळ पडदा होता. तो आता नाहीसा झाला. जे सामर्थ्य सद्गुरुंच्या अंत:करणात होते ते जसेच्या तसे शिष्याच्या अंत:करणात प्रवृत्त झाले. "ये हृदईचे ते हृदई घातले।" — माऊली. जे जे गुरुजवळ होते ते ते सर्व शिष्याला प्राप्त झाले. परीसाच्या स्पर्शामुळे लोखंडाचे सोने होते. परंतु इथे गुरुंच्या कृपाप्रसादामुळे शिष्याचे सोने नाही तर परीसच झाला.

अशा शिष्याचे पुढे प्रशिष्य झाले.

महंतांच्या ११/११ पिढ्या समर्थ ह्यातीतच झाल्या.

विकल्पी गृहस्थांचा प्रश्न — पुत्राशिवाय गती नाही. तेव्हा समर्थ म्हणाले — माझ्या पुढील ११ पिढ्या तयार आहेत.

परीस खरोखर अस्तित्वात आहे की नाही का केवळ कल्पनेतच आहे हे ठाऊक नाही. परंतु परीसाने परीस निर्माण झाला ही कल्पना कल्पनेत सुद्धा अस्तित्वात नाही. ते केवळ गुरुच प्रत्यक्ष करु शकतात.

शिष्य जेव्हा अनन्यभावाने शरण जातो तेव्हा गुरु आपल्या जवळचे सर्व काही त्याला देतात. परंतु हे बोलणे देखील तितकेसे खरे नाही. कारण देण्यासाठी देणारा (गुरु) तरी शिल्लक पाहिजे ना! म्हणजे पुन्हा द्वैत आले.



© www.madhaveeraghuveer.com

ज्योतीला ज्योत मिळाल्यावर पहिली कोणती
व दुसरी कोणती हे सांगता येणार नाही.
8 आधीच मागुन वडील धाकटु - गुरु-शिष्य -

9 दृष्टान्तो नैव दृष्टास्त्रिभुवन जठरे सदगुरोर्ज्ञानदातुम्।
स्पर्शश्चेत तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्म
10 सारम्।
न स्पर्शत्वं तथापि श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीय शिष्ये
11 स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपमस्तेन वा लौकिकोऽपि।

12

1

2

3

4

5

6

गुरु स्वामिच्या हृदईचे।
शिष्यास नमे तयाचे।
प्राप्त जाले योगियांचे।
निजबीज ॥१०॥
बहुता जन्मांच्या सेवटी।
जाली स्वरूपेसी भेटी।
येका भावार्थासाठी।
परब्रह्म जोडले ॥११॥

स्वामिंच्या / गुरुंच्या हृदयातील गुह्य होते, जे योगियांचे निजबीज होते, ज्याच्यासाठी योगी प्रयत्न करतात ते सारे शिष्याला मिळाले.

परंतु गुरुंकडील वैभव काही कमी झाले नाही. पूर्णातून पूर्ण काढून घेतले तरी पूर्णच उरते.

ग्रंथातील मंत्र एका किंवा अनेक शिष्यांनी मुखोद्गत केले तरी ग्रंथातील अक्षरे कायम रहातात.

नैवेद्य देवता गंधरूपाने ग्रहण करतात.

(११) बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः॥

स्वरूपाचा हा जन्मजन्मांतरीचा जो विरह होता, जी तारातूट झाली होती ती सरली आता. जीवाशिवाचे मीलन झाले. ऐक्य झाले. तद्रूपता आली. वेगळेपणा / द्वैत उरले नाही. सर्व जगत वासुदेवमय झाले.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद भ्रम। अमंगळ

भेद उरतच नाही.

© www.madhaveeraghuveer.com

एकनाथ महाराजांच्या हातून घडलेली एक वेची चूक त्यांना सापडली तेव्हा त्यांना अत्यानंद झाला. टाळ्या वाजवल्या.

गुरु म्हणाले - जन्मोजन्मी ज्या चुका झाल्या त्या सापडल्या तर किती आनंद होईल?

त्यावर नाथ महाराज म्हणाले - मी त्यासाठीच तर तुमच्याकडे आलो आहे. हे जमते ते केवळ भावार्थामुळे!

भावार्थ म्हणजे 'मी कोण आहे?' याची बुद्धीतील जाणीव. ते साधले की दुसरे संशोधन करावे लागत नाही.

भावार्थ ही सर्वात सोपी व फुकट मिळणारी गोष्ट आहे. परंतु माणसाच्या स्वार्थ/अज्ञानामुळे ती दुर्मिळ झाली आहे.

© www.madhaveeraghuveer.com

जो वेदशास्त्रांचा गर्भ। निर्गुण परमात्मा स्वयंभ।
तयाचा येकसरा लाभ। जाला सद्भावे ॥२२॥
जे ब्रह्मादिकांचे माहेर। अनंत सुखाचे भांडार।
जेणे हा दुर्गम संसार। सुखरूप होये ॥२३॥

वेद हे अपौरुषेय आहेत. परंतु त्यात सांगितलेले ज्ञान मानवाच्या हितासाठी विस्तृतरूपाने आहे. अशा वेदशास्त्रांचा जो गाभा (सार आशय) आहे, त्याचा विचार केला तर असे दिसते की निर्गुण परमात्माच जणू त्यातून अवतरला आहे.

परमात्मा हा अनादि अनंत आहे. त्याला आरंभ नाही अंत नाही. त्याला माता पिता नाहीत. तो स्वयंभू आहे. तो सनातन आहेच. त्याचा कधीहि अभाव नसतो. Always existing आहे.

हे सारे शब्दज्ञान मला अवगत होते. परंतु सद्गुरु कृपेमुळे मला या साऱ्याचा लाभ येकसरा म्हणजे एकाच ठिकाणी झाला. मला त्यासाठी काही वेगळी शोधाशोध करावी लागली नाही. हे सर्व सद्भावामुळे।

प्रेम, श्रद्धा, निष्ठा, करुणा, भक्ति, वात्सल्य, दया हे सारे भाव आहेत. परंतु कधी कधी या भावांना देखील स्वार्थ चिकटतो. तसा दूषित भाव नाही तर इथे मुद्दाम सद्भावाचा उल्लेख केला आहे.

'आध्यात्मिक गुरु' हा देखील बिनभांडवली धंदा झाला आहे. असे गुरु गल्लोगल्ली असतात. अगदी अडक्याचे तीन देखील मिळतात. परंतु ते काही सद्गुरु नाहीत. त्यांच्या सांगण्यामुळे आपल्या जीवनाचे निश्चितच कल्याण होणार नाही



© www.madhaveeraghuveer.com

बिंब तरी बचके एवढे। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे।

— माउली

320-046 • WEEK 47

2016 OCT

NOVEMBER 15 TUESDAY

उलट नुकसानच होण्याची शक्यता असते.
म्हणून सद्गुरु, सद्शिष्य, सद्भावने असे म्हणावे लागते.
सद्गुरु आणि सत्शिष्याची उत्तम जोडी असते. त्यांच्यामध्ये सद्भाव असतो. तेव्हा आत्मज्ञान दूर नसते. आणि एका ज्ञानामुळे सर्व विश्व उजळून निघते.
(93) जे मूळस्थान आहे ते सर्व शक्ती, देवतांचे उगम स्थान आहे.
∴ ते ब्रह्मादिकांचे माहेर आहे. ते अनंत सुखांचे भांडार आहे. तिथल्या सुखाला सीमा नाही. त्याचे वर्णन करता येणार नाही. त्याची तुलना होऊ शकत नाही. मानवी जीवनात जे जे आनंद पं इंद्रियाद्वारे भोगता येतात त्याच्याही पलीकडे हा आनंद आहे. स्वर्गीय सुख इथपर्यंत आपल्या कल्पनेची मजल जाऊ शकते. परंतु हे अनंत सुखांचे भांडार आहे.
तिसऱ्या चरणात मात्र नेमके वर्णन आहे. ज्याच्यामुळे हा दुर्गम संसार सुखरूप होतो.
दुःखाळय अशाश्वत असे या संसाराचे वर्णन गीता करते. परंतु जेव्हा परम पदाची प्राप्ती होते तेव्हा दुःख सरून जाते. अशाश्वताची कात गळून पडते व शाश्वत / चिरंजन तत्त्वाचा लाभ होतो.

ऐसे जयास ज्ञान जाले। तयाचे बंधन तुटले।
येरा नसोनीच जडले। सदृढ अविवेक॥९४॥
संदेह हेचि बंधन। निःशेष तुटला तोचि ज्ञान।
निःसंदेही समाधान। होय आपैसे॥९५॥

मुक्त जीवाला बंधन नसतेच. ते कल्पनेने निर्माण झालेले असते. विवेकाच्या अभावामुळे, अज्ञानाच्या दुराग्रहामुळे हे बंधन निर्माण होते.

समर्थ हे उत्तम मानसशास्त्रज्ञ होते. त्यामुळे आडमुठ्या माणसाला वठणीवर कसे आणायचे हे त्यांना निश्चित ठाऊक होते.

घोड्याला पाण्याजवळ नेता येते पण पाणी पाजता येत नाही. अशी म्हण आहे. तशी काही माणसे असतात. शहाणपणाच्या सर्व गोष्टी त्यांच्या बाबतीत पालथ्या घड्यावर पाणी असेच ठरतात. शहाण्या माणसाला ज्ञान झाल्यावर त्याचे बंधन तुटून जाते. परंतु त्यांना शहाणे व्हायचेच नाही. त्यांचा अविवेक दृढ (सदृढ) आहे. त्यांना बंधनातून बाहेर पडण्याची इच्छाच नसते.

(९५) अशा माणसांच्या बाबतीत, त्यांना वाटणारा संदेह हेच खरे बंधन असते. खरे तर, तोच परमार्थ मार्गातील अडथळा असतो. मोहनाश म्हणजेच संदेहनिवृत्ती हेच यावरील उपाय आहे.

संदेह दूर झाला की मग जिज्ञासा वाढते. जिज्ञासु वृत्तीने प्रश्न जरूर विचारावेत. जसजशी उत्तरे मिळत जातील, शंका फिटतील तसतसे अंतःकरण स्वच्छ होत जाते.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।

शिष्याने आपला शिष्यभाव जागता ठेवावा नाहि 2016
जसे भूक लागली की रडते म्हणजे आपली

© www.madhaveeraghuveer.com

आता कोठे धावे मन। तुझे चरण देखलिया।
— तुकोबा



मागणी नोंदवते अर्ज कायम आहे का निकाली आहे. याचा विचार ते करत नाही.
साधकाने आपले प्रश्न सद्गुरूंना नक्कीच विचारावेत. प्रश्न योग्य की अयोग्य हे सद्गुरू ठरवतील. परंतु साधकाची शंका दूर होईल.
अर्थात शंका विचारण्यापूर्वी गुरूंचा अधिकार मान्य असावा लागतो. त्यांच्याविषयी श्रद्धाभाव असावा. विचारणाऱ्याच्या मनात गुरूंविषयी संशय नसावा. म्हणजे मग निःसंदेह होता येते.
आपैसे म्हणजे आपोआप / सहजासहजी —

येथे प्रत्ययास कारण प्रत्ययो पहावा।
स्वतः अनुभव घ्यावा।

सोने आटवून त्याची लगड करावी तशी आत्मारामाची मांडणी आहे.
शुद्ध अध्यात्म हा विषय आहे.
याचा स्थायी भाव निर्वेद व शांत आहे.
रचना युक्ति संगत व मृदु आहे.
भक्ति आणि ज्ञानाचा समन्वय आहे.
साधकासाठी दीपस्तंभ आहे.



© www.madhaveeraghuveer.com

2016 DEC

२८ जुलै २०२२

WEEK 47 • 323-043

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

18 NOVEMBER FRIDAY

प्राणियास माया सुटेना। अभिमाने त्रिपुटी तुटेना।
वृत्ति स्वरूपी फुटेना। स्फूर्तिरूपे ॥९६॥
जे मायाजाळी पडिले। ते ईश्वरासी चुकले।
ते प्राणी सापडले। वासना बंधनी ॥९७॥

प्राण्याला काही केल्या माया सुटत नाही. मायेने त्याला ज्ञानबाहेर व्यापून टाकले आहे. आणि ही माया इतकी लोभस, आकर्षक आहे की त्यात मनुष्य गुंतत जातो. ही माया विविधरूपे घेऊन येते. कधी घर संसार, पत्नी-मुलबाळे, आप्तजन, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा, रूप, लावण्य, वैभव यांच्या आहारी जातो. आणि विशेष म्हणजे यात काही चूक आहे, असेही त्याला वाटत नाही. उलट त्या आकर्षणाला, मोहाला तो 'कर्तव्य' या शब्दाचा अंगरखा चढवतो. व स्वतःला फसवत रहातो.

मायिक नश्वर विषयसुखास्तव
माजविले बडिवारे।
आत्मदेव न जाणुनि आम्ही
देहाचे देव्हारे॥ अमृतधारा - ८८

ज्ञानेंद्रियांमुळे होणाऱ्या ज्या अनुकूल संवेदना आहेत त्या सर्व विषयसुखात मोडतात. आणि हे सर्व प्राप्त करून देणारा देह साहजिकच आपल्याला अतिशय प्रिय वाटतो. परंतु या देहापेक्षाही आपले प्रेम स्वतःवर असते. ती आपल्या मूळ स्वरूपाची जाणीव असते. या स्वरूपालाच 'आत्मदेव' असे म्हटले आहे. हेच आपले चैतन्य स्वरूप, शुद्ध 'मी' किंवा आत्मस्वरूप आपले अवधान जेव्हा स्वरूपावर असते म्हणजे चित्त चैतन्यस्पर्शी होऊन राहते तेव्हा ते स्थिर शांत, आनंदी, प्रसन्न असते हीच सुखमय अवस्था।

2016

©www.madhaveeraghuveer.com

भाग गेला शीण गेला । अवघा झाला आनंद ॥



विषयसुखाच्या कितीतरी पटीने आनंद आत्मसुखात असतो. विषयसुख हे भासमान, मायिक आणि तात्पुरते असते. ते लगेच नष्ट होते.

शरीरात मध्यवर्ती आत्मदेव आहे. देह हा त्याचा देव्हारा आहे.

काया ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल ।
नांदतो केवळ । पांडुरंग ॥

देह देवाचे मंदिर । आत आत्मा परमेश्वर ॥

असे संतांनी सांगून ठेवले असले तरी माणसे देहसुखाचे माहात्म्य वाढवून ठेवतात आणि ते अधिकाधिक प्राप्त व्हावे म्हणून प्रयत्न करत राहतात. सगळं लक्ष शरीर, संसार आणि त्यातून मिळणारे मानीव सुख ।

आणि हे सर्व खऱ्या सुखाचा अनादर करून !

घेता भोग व्हावे कामनेची तृप्ती ।
बळावे आसक्ति अमर्याद ।
अग्नि लागे शांत करावया घृत
अर्पिता निभ्रांत प्रज्वळे तो ॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥

परंतु हे सर्व माणसाला समजते, पटते परंतु



तसे आचरण घडत नाही. कळते पण वळत नाही. आणि व्यर्थ अभिमानामुळे तो त्रिपुटीत गुंतून राहतो. ज्ञाता - ज्ञेय - ज्ञान
ध्याता ध्येय ध्यान
भोक्ता भोज्य भोजन



शिवाय सत्व - रज - तम हे त्रिगुण नाचवतात.

© www.madhaveeraghuveer.com

आणि त्यामुळे वृत्तीला लक्ष्यामध्ये जी जाग यायला पाहिजे ती येत नाही. त्याचा परिणाम म्हणून मन सतत बहिर्मुख राहते. इंद्रियांचा विषयांशी सतत संयोग होत राहतो. त्यामुळे मायिक आकर्षणात गुंतणे होते. आणि या सर्व पसाऱ्यामध्ये सूक्ष्म असणारे आत्मतत्त्व काही जाणता येत नाही.

(९७) जे मायेच्या जाळ्यात सापडतात ते साहजिकच ईश्वरापासून दुरावतात. मायेच्या जाळ्यात सापडतात म्हणजेच वासनेच्या बंधनात अडकतात. या तीन प्रकारच्या आहेत.

धनेषणा —— दारेषणा —— लोकेषणा.

या एकापेक्षा एक सूक्ष्म होत जाणाऱ्या आहेत.

या तिन्ही एषणांमध्ये न सापडता ईश्वरापर्यंत पोहोचणे हे मानवी जीवनाचे ध्येय असायला पाहिजे. परंतु वैषयिक माणसांना हे कसे गवसणार?

महाद्वार वोलांडावे। मग देवदर्शन घ्यावे।
तैसे हृदय सांडावे। जाणोनिया ॥ दास-६.४.५८

कृतकृत्यता।

ज्याचे दैव उदेले। तयास ज्ञान प्राप्त झाले।
तयाचे बंधन तुटले। निःसंगपणें॥ ९८॥

दैव ही भाग्याची गोष्ट आहे. शरिराने पाहिजे तेवढे प्रयत्न करता येतील पण त्यात भाव, आस्था, तळमळ निर्माण करणे हे काही प्रयत्नांनी साधता येत नाही.

घोड्याला पाण्याजवळ नेता येते. पण पाणी पाजता येत नाही. अगदी श्रीमंती थाटामध्ये सर्व वैभवासहित षोडशोपचार पूजा एकवेळ करता येईल पण त्यामुळे पूजेमध्ये प्रेम उत्पन्न होईल का? ते आपल्या स्वाधीन नाही. उलट त्यातून अहंकार बळावण्याचीच शक्यता अधिक आहे.

अनेकदा बाह्य अवडंबरामुळे अंतरीचा भाव लोपून जातो. आणि भावाशिवाय भगवंत भेटत नाही.

**मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव।**

मंत्रे तीर्थे द्विजे देवे भेषजे दैवते गुरौ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी॥

देव बाहेरच्या देखाव्याला भुलत नाही. त्याला हवा तो भाव, प्रपन्नता, अनन्य शरणागती।

त्याची जर विनम्रतेने कळवळून, मनापासून प्रार्थना केली तर तो धावून येतो.

द्रौपदीसाठी धावून आला वस्त्रे पुरवली.

भक्त प्रल्हाद, ध्रुव बाळ, गजेंद्र

सदा चक्रवाकासी मार्तंड जैसा।
उडी घालितो संकटी स्वामी तैसा॥

© www.madhaveeraghuveer.com

NOVEMBER 24
THURSDAY

अर्थात इथे भक्तीचा नाही तर ज्ञानाचा विचार आहे. आणि आत्मज्ञानाचा प्रकाश देणारा देखील एक परमेश्वरच आहे. हे ज्ञान केवळ ग्रंथ वाचन करून, पदव्या, पारितोषिके मिळवून प्राप्त होत नाही. त्यासाठी देखील त्याचीच कृपा हवी

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः
न मेधया, न बहुधा श्रुतेन।
यं एव वृणीते तेन
तस्य हि लभ्यः।

© www.madhaveeraghuveer.com

सर्वसाक्षी तुर्यावस्था । तयेचाही तू जाणता ।
म्हणोनि तुज निःसंगता । सहजाचि आली ॥१९॥
आपणासी तू जाणसी । परी तूही नव्हेसी ।
तूपणाची कायेसी । मात स्वरूपी ॥२०॥

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्था आहेत त्याही पलीकडे तुर्या अवस्था असते. तिच्यामध्ये केवळ जाणीव, संवित् Consciousness केवळ साक्षीपणाने असते. तिथे कोणताही उपभोग वा कर्तेपणाची जाणीव उरत नाही. मी आत्मस्वरूप आहे ह्याचे शुद्ध स्फुरण तिथे असते.

जागृती - मी जागा आहे. स्थूल इंद्रिये, मन, बुद्धि यांच्या सहाय्याने मी विविध अनुभव घेतो आहे. मला त्याचे भान आहे. माझे नाव, पदवी, हुद्दा, सामाजिक संबंध हे मी जाणतो. उपभोग घेतो. सुख दुःखाचा अनुभव घेतो.

स्वप्न - स्वप्नामध्ये मनोनिर्मित दृश्यांच्या भासमान सृष्टीचा अनुभव साधक घेत असतो. वेगळ्याच दुनियेमध्ये रमतो.

सुषुप्ती - म्हणजे गाढ झोप। यामध्ये जागृती नसते किंवा स्वप्नेही नसतात. भासमान दृश्ये नसतात. तिथे तो स्वतःला पूर्णपणे विसरून जातो. परंतु झोपेतून जागा झाल्यावर मी गाढ झोपलो होतो याची जाणीव होते. म्हणजे जेव्हा मी गाढ झोपलो होतो तेव्हा जाणणारा कुणीतरी होताच.

यत्स्वप्नजागरसुषुप्तिमवैति नित्यम्
तद् ब्रह्म निष्कलमहं न च भूतसंघः ।

© www.madhaveeraghuveer.com

आत्मस्वरुप जाणणे - जीवनसाफल्य



मात्र तुर्यावस्था या सर्वांच्या पलीकडे आहे. या तीन अवस्थांपैकी कोणतीही जाणिव तिथे शिल्लक नसते. मी आत्मस्वरुप आहे एवढीच शुद्ध जाणीव तुर्यावस्थेमध्ये असते. म्हणून ती सर्वांच्या पलीकडे आहे, असे म्हटले आहे.

जे जाणावयाचे आहे ते आणि ती जाणिव दोन्हीही इथे लोपून जातात. केवळ निःसंगता उरते. त्यात कोणताही संग किंवा लेप शिल्लक रहात नाही. एक प्रकारची निर्लिप्तता येते.

(२०) तू आपल्याला जाणतोस असे म्हणत आहेस पण यातला तू म्हणजे तरी नक्की कोण?

म्हणजे जाणणारा कोणी शिल्लक आहे का? जिथे जाणणारा उरतो आहे. तिथे अर्थातच द्वैत आहे. आणि आत्मज्ञानामध्ये तर द्वैत चालतच नाही.

तया एकरुपासी दुजे न साहे।
मना अंत आनंत शोधूनि पाहे॥

अज्ञानाच्या तीन अवस्थांमध्ये 'मी देह आहे' अशी जाणीव म्हणजेच मीपणा असतो.

ज्ञानामुळे प्राप्त झालेल्या तुर्यावस्थेत देहबुद्धी नसली तरी मी आत्मा आहे ही ज्ञानावस्था तरी असतेच. मात्र परमात्मस्वरुपात विलीन झाल्यावर हे दोन्हीही उरत नाही. ज्ञान अज्ञानाला



विलीन करते व स्वतः आत्मस्वरुपात मिसळून जाते. असे असताना 'मी मला जाणतो' असे तू कसे म्हणतोस?

©www.madhaveeraghuveer.com

तुरटी आणि खडीसाखर -

जाणता आणि वस्तु । दोन्ही निमाल्या उर्वरितु ।
तू पणाची मातु । सहजाचि नाव ॥२०॥

जाणता ही जर वस्तुच असेल तर जाणणे कुठे शिल्लक रहाते? सगळे काही एकरूपच होऊन गेले. दोन्ही निमाल्या उर्वरितु।
मी तू पणा आटून गेला (पूर्ण नाहीसा झाला. आणि हे सर्व अगदी सहजपणे झाले.

तत्त्वमसि वाक्याचे परमात्म स्वरूप -

© www.madhaveeraghuveer.com

NOVEMBER 29
TUESDAY

2016
OCT

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

समर्थांनी आपल्या त्र्याहत्तर वर्षांच्या कालावधिमध्ये
कमीत कमी ३६,००० ओवींची रचना केली.

आत्माराम - आत्मस्वरूपाचे मौलिक निरूपण।
निर्गुण, अद्वैती तत्वज्ञान
समर्थांच्या आवडीचा ग्रंथ आहे.

जैसे ग्रंथी बोलिले। तैसेचि स्वये पाहिजे जाले।
येथे क्रियेच्या माथा आले। निश्चितार्थी॥



© www.madhaveeraghuveer.com

आता असो शब्दपाल्हाळ । तुझे सुटले जन्ममूळ ।
का जे नाशिवंत सकळ । मदार्पण केले ॥२२॥
जे जे जाणोनि टाकीले । ते ते नाशिवंत राहिले ।
तुझे तुज प्राप्त जाले । अक्षई पद ॥२३॥

खरं तर समर्थ अतिशय गहन असे अद्वैताचे निरूपण करत आहेत. केवळ मुद्द्याचे बोलत आहेत. थोडक्यात तरीही आशयगर्भ सांगत आहेत. आणि तरीही स्वत:कडे कमीपणा घेऊन आपल्याच बोलण्याला पाल्हाळिक म्हणत आहेत.

कारण अध्यात्ममार्गविवेक या अखेरच्या टप्प्यात जिथे न बोलणे हेच संयुक्तिक ठरते. मौनामध्य विचारांची देवाणघेवाण होते तिथे हे इतके शब्द बोलणे हे पाल्हाळच झाले.

तिथे शब्दांना कामच उरत नाही.

गुरोस्तु मौनं व्याख्यानम् । असे होऊन जाते आणि शिष्या, तू आता यापलीकडे गेला आहेस. तुझे जन्ममूळ सुटले आहे. हे शब्द मायेच्या प्रांतातील असल्याने जन्ममूळ यातूनच निर्माण होते. आणि शब्द देखील नाशिवंत आहेत आणि तू तर सगळे नाशिवंत मला देऊन टाकले आहेस. त्यामुळे जन्माला कारण ठरणारी वासना संपून गेली. जन्ममरणाचे चक्रच संपून गेले.

(२३) तू हे सर्व जाणून बुजून टाकून दिले आहेस. त्याचा परिणाम म्हणून तुला अक्षय पद प्राप्त झाले आहे.

जया अंतरी भगवंत । अचळ राहिला निवांत । तो स्वभावे जे बोलत । ते ब्रह्मनिरूपण ॥

ऐसे बोले मोक्षपाणि । ऐकोनि शिष्य लोटांगणी । निःसंदेह स्वरूपमिळणी । दोघे येकचि झाले ॥२७॥

मोक्षपाणी - ज्याच्या हातात मोक्ष देण्याचे सामर्थ्य आहे असे अद्भुत सद्गुरु।

ते म्हणतात - तू नाशिवंताचा त्याग केल्याने तुला अक्षय पद प्राप्त झाले आहे. हे ऐकल्यावर शिष्याने लोटांगण घातले आहे.

याचाच अर्थ जरी परमश्रेष्ठ पद प्राप्त झाले तरी, शिष्याचा शिष्यभाव अजून गेलेला नाही. खरं तर आता गुरुशिष्य ऐक्य झाले. त्यांच्यात भेद उरला नाही. आता ते दोघे एकाच पातळीवर/ पायरीवर आले आहेत.

आता गुरुबरोबर बसायला काय हरकत आहे? परंतु ही वृत्ती निर्माण होणे हेच मुळी अहंकाराचे लक्षण आहे.

भावाद्वैतं सदा कुर्यात क्रियाद्वैतं न कर्हिचित । अद्वैतं त्रिषु लोकेषु नाद्वैतं गुरुणा सह ॥

तिन्ही लोकातील चराचराबरोबर अद्वैत असले तरी गुरुबरोबर अद्वैत साधू नये.

गुरुने शिष्याची कितीही स्तुती केली तरी शिष्याने स्वतःला त्यांच्या तोडीचे समजू नये.

शिष्यात इच्छेत पराजयम् । हे वचन जरी खरे असले तरी ते कदाचित कौतुकाने जास्त बोलत असतील, कदाचित शिष्याला प्रेरणा, उत्तेजन देण्यासाठी दोन शब्द अधिक खर्च करत असतील. परंतु शिष्याने स्वतःला सद्गुरुंच्या तोडीचे मानणे ही भ्रांती आहे.

© www.madhaveeragniveer.com

यतो वाचा निवर्तन्ते । - उपनिषद
येथे शब्द पांगुळला - ज्ञानेश्वरी

338-028 • WEEK 49

DECEMBER 03
SATURDAY

2016 NOV

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | |

प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रमित्रवदाचरेत् ।
बापाने मुलाला मित्रासारखे वागवावे,
परंतु याचा अर्थ असा नाही की लगेच मुलाने वडीलांच्या गळ्यात हात टाकावा.
शिष्याने स्वतःला गुरूच्या बरोबरीचे समजू नये. इथे देखील 'अद्वय पद' लाभून देखील शिष्य गुरूसमोर लोटांगण घालत आहे. तो त्याचा सहज भाव आहे. 'दोघे एकाचि ज्ञाले' असले असले तरी ही शिष्याची कृतज्ञता आहे.

जयाचे दैव उदेले । तयासि ज्ञान प्राप्त झाले ।
तयाचे बंधन तुटले । निःसंगपणे ॥

पूर्वसुकृताची जोडी । म्हणुनि विठ्ठल आवडी ॥

04 SUNDAY

2016

ऐसा कृपाळू स्वामीराव। आदिपुरुष देवाधिदेव।
शिष्यासी निजपदी ठाव। ऐक्यरूपे दिधला ॥२५॥
जो शिष्य स्वामीस शरण गेला।
आणि संदेहावेगळा जाला।
तेणे जन्म सार्थक केला।
जो देवांसी दुल्लभु ॥२६॥

सद्गुरु हे कृपाळु असतात. त्याच वत्सलतेने गुरुंनी शिष्याला आपल्याजवळ ठाव दिला.

सद्गुरु हे आदिपुरुष आहेत, देवाधिदेव आहेत. हे ब्रह्माचे सान्निध्यच आहेत. म्हणून तर प्रार्थनेत गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। असे म्हटले जाते. किंवा ब्रह्मानंदं परमसुखदं---

हेही केवळ शाब्दिक नसावे. त्यात शिष्याच्या अंतरीचा भाव असायला पाहिजे. माझे सद्गुरु साक्षात ब्रह्मच आहेत अशी प्रामाणिक भावना हवी.

साधकाच्या अंगी जोवर 'मीपणा' असतो तोवर स्वतःच्या प्रयत्नांवर भरवसा असतो. पण साधनेने तो कमी कमी होत जातो तसतसा गुरुंच्या महतीचा, ईश्वरशक्तीचा प्रत्यय येत जातो. इथे तर गुरुंनी शिष्याला कृपाळूपणाने मोक्ष प्राप्त करून दिला, आत्मस्वरूपी स्थान दिले. म्हणून प्रत्येक शिष्य सद्गुरुंना परमेश्वरच मानतो.

(२६) गुरुंच्या उपदेशाने शिष्य निःसंदेह होतो. त्याच्या सगळ्या क्रिया विनयाने उमटून येतात. सर्वच क्रियांमध्ये सहजता येते. वेदांताची हेच तर खरी मेख आहे. हे प्रकरण कठीण आहे. काही ठिकाणी वेदांत

संपूर्ण समजला तरी द्वैत सोडता येत नाही.
नामदेव महाराज - कच्चे मडके म्हणून गोरोबांनी सांगितले — अपमान झाला —
अजूनही 'सर्व खल्विदं ब्रह्म' हे लक्षात आले नाही. सगळीकडे ब्रह्मच आहे असे समजल्यावर मातीचे मडके आणि आपले डोके यात फरक कुठे राहिला? आणि हे समजून घेण्यासाठीच सद्गुरूंचे मार्गदर्शन हवे. देव तसे मार्गदर्शन करू शकत नाही.
वैद्य आपल्याच मुलाला औषध देत नाही. तेव्हा नामदेवराय औंढ्या नागनाथ येथे गेले. तिथे विसोबा खेचर सद्गुरूस्वरूपात भेटले.
गुरूंनी फटकारल्यावर, गुरूंच्या चरणस्पर्शी झाल्यावर नामदेव पूर्ण झाले, सिद्ध झाले.
थोडक्यात काय, अगदी ब्रह्मसाक्षात्कार झाला तरी सगुणोपासना सोडू नये.

सगुणी भजे लेश नाही भ्रमाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥

योगाभ्यास करून चुकले ईश साऱ्या जगात।
ना टाकावे सगुण भजना मर्म आहे तयात।
अद्वैताला हृदि धरुनिया कर्म द्वैती करावे।
का की प्राणा जरुर तनुचे हेच ध्यानी धरावे॥

Electricity — Instruments.
भक्तिमार्गामध्ये भक्त-भगवान, गुरू-शिष्य हे द्वैत सन्मानाने स्वीकारले जाते.
शिष्याने सर्वस्व समर्पण केले आहे. शरण आला.

© www.madhaveeraguruver.com

ग्रंथ संपता स्तुति उभरे। बोलताती अपारे।
परी अर्थासी कारणे येरे। येरा चाड नाही॥२७॥
इति श्री आत्माराम। रामदासी पूर्णकाम।
निःसंदेह झाले अंतर्याम। सद्गुरुचरणी॥२८॥

ग्रंथाच्या समारोपाला माणसे स्तुती करू लागतात. नारेमाप गोडवे गायले जातात.

इथे स्वामी म्हणतात- आम्हाला स्तुतीची चाड नाही. आम्हाला चाड आहे ती अर्थाची।

अर्थ्यते इति अर्थः

जे मिळवण्यासाठी प्रयत्न केला जातो त्याचे नाव अर्थ. पुरुषार्थी, विद्यार्थी, धनार्थी, लाभार्थी.

जी गोष्ट हितकारक, कल्याणकारक, प्रगतीच्या मार्गाने नेणारी असेल तर ती स्वीकारावीशी वाटते.

परंतु व्यवहारात मात्र वेगळेच चित्र दिसते. विशेषत: स्वाध्याय शिबिरात लोक राहण्याच्या सोयीबद्दल, स्नानाच्या पाण्याबद्दल, चहा, भोजन, टापटीप, स्वच्छता याबद्दल जास्त बोलतात.

मग केव्हातरी सहजच कीर्तन- प्रवचनाबद्दल बोलतात. त्यातही बुवांचे दिसणे, वक्तृत्व, गर्दी याविषयी बोलले जाते. किंवा स्त्री प्रवचनकार- साडी, व्यक्तिमत्व, अलंकार, वक्तृत्व- सरस्वती साक्षात अवतरली इ० बोलले जाते.

कार्यक्रमाचे ते खरे प्रयोजन नाही. अर्जुनासारखा श्रोता वक्त्याला पसंत पडतो.

अर्जुना तू परिससी। परिसून अनुष्ठिसी।
मग आम्हांसिची वानी कायसी। सांगावयाची॥

परिसून अनुष्ठिसी हे इथे महत्वाचे आहे.

सांगजाले वेदो नित्यमध्यायितां तद्युदितं कर्म स्वनुष्ठीयतां।
~~[illegible]~~ आणि वर्तले। तोचि भाग्यपुरुष भले॥

श्रोते तोंड फाटेस्तोवर वक्त्याची स्तुती करतात. त्यांच्याकडे शब्दभांडार पुष्कळ असते. परंतु खऱ्या परमार्थी वक्त्याला त्याची गरज नसते. जे ऐकले त्यापैकी किती समजले, त्यातील किती आचरणात आणले याला महत्त्व आहे.

ग्रंथामधील बोध वाचकांच्या बुद्धीत उतरायला हवा.

इथे समर्थांनी गहन विषय सोपा करून सांगितला आहे. दृष्टांत अतिशय साधे सोपे व्यवहारातील आहेत. ओव्यांची रचना बालबोध स्वरूपाची आहे. आणि हे सर्व कशासाठी?

ऐसी हे कळवळ्याची जाती। लाभावीण करी प्रीती।

मानवी जीवन हे अमूल्य आहे. त्यात असमाधान, दुःख, चिंता, भय आहे. त्यातून सुख समाधान प्राप्त करण्यासाठी, निर्भयतेने प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी, अज्ञान दूर करण्यासाठी समर्थांसारखे संत तळमळत असतात. वाङ्मयनिर्मिती करत असतात. त्यांच्या या तळमळीला तरी श्रोत्यांनी/ वाचकांनी/ प्रेक्षकांनी प्रतिसाद द्यावा.

हा आत्मबोध सर्वांच्या अंतःकरणात ठसावा इतकीच समर्थचरणी प्रार्थना!

न लोभ दुसरा घडो गुरुपरंपरारक्षणा।
सुबोध मज लाभ दे, इतरही तयासी जना।
वरून निज मानसी, प्रगति उन्नति साधण्या।
वळोत, म्हणुनि गिरा प्रवचनी न केल्या उण्या॥

समाजसुधारणेच्या कार्यासाठी संत आपले शरीर, वाणी, लेखणी झिजवतात. त्या दिव्यत्वाला वंदन!